विश्व वाणी

समर्पण

Rs. 10/- | Vol. 33 - Issue 1
Dec. 2019 & Jan. 2020 Combined issue

प्रभूची सेवा म्हणजे त्यांची सेवा जे त्याची स्तुती करतात.

१०.०१.१९४१–१९.१२.२०१३

आठवतो...

एमिल अन्नन विश्ववाणीचे संस्थापक खुप स्तुती आणि अश्रुंसह १९.१२.२०१३ रोजी ते परमेश्वरासोबत वास्तव्यास गेले. जरी सहा वर्ष गेली असतील तरी आम्ही एमिल अन्नन यांच्या दृष्टांताकडे व समर्पणाकडे वाटचाल करत आहोत, विश्वास प्रार्थना व भारतीय विश्वासणारे जे भारताच्या एक लाख गावामध्ये मोठया आशिर्वादाच्या ठिकाणांसह बदलणार आहेत त्यांच्या सहाय्यासह, आम्ही पूढे जात आहोत.

हिमाचल प्रांत प्रार्थना शिबिर

आ शिर्वादित आहेत ते लोक ज्यांनी 'हा पर्वत आम्हाला दे' असे देवाकडे रडत म्हणण्याच्या परिणामाची साक्ष दिली. आणि पश्चिम बंगाल व हिमालयाच्या पायथ्याच्या टेकडयांवर असलेल्या गावांमध्ये देवाचा हात ते पाहू शकले. ६०० विश्वासणाऱ्यांबद्दल परमेश्वराची स्तुती असो ज्यांनी मट्टीगारा प्रशिक्षण केंद्र, सिलुगुरी येथे शिबिर घेतले आणि प्रार्थना केली. कूचबिहार, अलीपूरदुआर न्यु जलपायगुरी, दार्जिलिंग आणि कलीम्पाँग येथील विश्वासणारे ज्यांनी प्रार्थना शिबिरा मध्ये भाग घेतला त्यांनी सुवार्ता सेवाकार्याच्या गरजा आणि त्यांची तातडीची निकड जाणली. म्हणून प्रथमतः त्यांनी परमेश्वराला व सुवार्ता कार्याला स्वतःचे समर्पण केले. सेवक आणि सेवाकार्याचे भागीदार जे हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या २००० गावांना ख्रिस्ताकडे आणण्यासाठी अश्रूंनी व ओझ्याने कष्ट करतात त्यांच्यासाठी आपण प्रार्थना करणे गरजेचे आहे. बलजीत पसूमाता, समीर इश्वरारी, प्रकाश छेत्री, निम त्शेरींग लेपचा आणि रोशन नारझीनरी जे प्रार्थना शिबिर व मिट्टीगारा कार्यालयातील सेवकांशी समन्वय साधतात, या वेगवेगळया प्रांतातील कोऑर्डीनेटरसना परमेश्वर सामर्थ्याने बलशाली करो.

-आशानंद लिमा

मननाचे मुद्दे...

* जे देवाची स्तुती करतात त्यांच्यासाठी देवाचे कार्य आहे
* ज्या सर्वांनी मागितले आणि प्राप्त केले ज्याने ते दिले त्याचे जर त्यांनी आभार मानले नाही तर त्यांनी पुन्हा मागितले तरीही त्यांना प्राप्त होणार नाही.
* आपण गरजा भागविण्यासाठी प्राप्त करतो, आपण प्रभू मध्ये वाढण्यासाठी स्तुती करतो.
* बॉम्ब यरीहोची भिंत हालवू शकले नाही, परंतू देवाच्या लेकरांची स्तुती ते कार्य करू शकली.
* मार्था मरीयेला स्तुतीची मागणी करते, जो मागतो त्याच्या पेक्षा जो स्तुती करतो त्याचा सन्मान होतो.
* लोकं त्यांच्या गरजा भागविण्यासाठी येतात, जर गरज नसेल तर ते विसरून जातील हा मनुष्यप्राण्यांचा स्वभाव आहे.
* इतर नऊ कोठे आहेत?

प्रभू येशूच्या गौरवशाली शुभवर्तगानाद्वारे भारतातील खेडी आशिर्वादित होताना पाहणे

विश्ववाणी समर्पण

डिसेंबर.१९ आणि जानेवारी.२०

PUBLICATION OFFICE:
1-10-28/247, Anandapuram, Kushaiguda, E.C.I.L. P.O., Hyderabad-500062. ✆ 27125557.
samarpan@vishwavani.org

ADMINISTRATIVE OFFICE:
20, Raghul Street, T.M.P. Nagar, Pudur, Ambattur, Chennai-600053. ✆ 26869200
vishwavaninet@vishwavani.org

स्टेट ऑफिस
विश्ववाणी, २०/१४१, एम. एच. बी. कॉलनी रूपा साडी सेंटर जवळ
अंबरनाथ (प.) ठाणे (४२१५०५) ८००७३७७७३३
* Email: prakashg@vishwavani.org

Our Bank Details:

Bank : State Bank of India
A/C Name : VISHWA VANI
A/C No. : 10151750252
IFS Code : SBIN0003273
Branch : Amanjikarai, Chennai - India.

Please inform us your transaction detail so that we can acknowledge with receipt.

✆ 9444455646. Email:
vishwavaninet@vishwavani.org

विश्ववाणी समर्पण मासिकः तामीळ, मल्याळम, तेलूगु, कन्नड, मराठी, गुजराती, हिंदी, ओडीया, बंगाली, इंग्लिश, कोकबोरोक, आणि सौरा या भाष्यांमध्ये प्रकाशित केले जाते. वार्षिक देणगी १०० रू.

अनुक्रमणिका

१. मननाचे मुद्दे.....०३
२. एक्झीक्युटीव्ह डायरेक्टरकडून.....०४
३. मुख्य आकर्षण.....०८
४. स्टेट को-ऑर्डिनेटरचे पत्र.....१६
६. नेटवर्क चेअरमेन.....१८
७. लहान भावना.....१२
८. क्षेत्रिय वार्ता.....२४
९. महाराष्ट्र सेवा क्षेत्रातून.....३३
१०. महाराष्ट्र सेवकांचे संपर्क.....३६

एक्झीक्युटीव्ह डायरेक्टर यांच्याकडून स्तुती आणि प्रार्थना पत्र

त्यांच्यासाठी जे स्वेच्छेने सुवार्ता कार्यामध्ये सहभागी झाले आणि संपूर्ण वर्षभर प्रार्थना व देणगीद्वारे त्यासाठी ज्यांनी सहाय्य केले, प्रभू येशू ख्रिस्त ज्याने संपूर्ण वर्षभर पूर्णतः आशिर्वादांच्या भरपूरीने जीवनाला मुकूट मंडित केले, त्याच्या नावामध्ये मी तुम्हाला अभिवादन करतो. सेवकांच्या वतीने मी तुम्हाला एक विशेष नाताळ आणि नवीन वर्षाच्या आशिर्वादांच्या शुभेच्छा देतो. देवाच्या उपस्थितीची परिपूर्णता सर्व दिवस तुम्हाला आशिर्वाद देवो आणि तूमचे मार्गदर्शन करो. कृपया प्रार्थना करत रहा, उत्साहाने सहकार्य करा आणि स्वंयसेवीरित्या विश्ववाणी सेवाकार्या मध्ये सहभागी व्हा. .

हे माझ्या जीवा, परमेश्वराचा धन्यवाद कर:

जो चांगुलपणा परमेश्वराने प्रत्येक व्यक्तीवर, कुटूंबावर आणि सुवार्ता कार्यावर २०१९ साला मध्ये दिला आहे तो खूप विस्तृत आणि उदार असा होता. मी जो अयोग्यतेचा आहे त्या माझ्यासाठी देवाने जो चांगूलपणा केला आहे. त्याबद्दल हे माझ्या जीवा, परमेश्वराचा धन्यवाद कर. असे म्हणत आपण आनंद करू या. आपण त्याच्या कार्याविषयी सांगू आणि त्याने आपल्यासाठी जो चांगूलपणा केला आहे त्या मानाने त्याची स्तुती करू.

स्तोत्र १४७:१२ का असे सांगते ? '' हे यरूशलेमे, परमेश्वराचे गौरव कर, हे सीयोने, तू आपल्या देवाचे स्तवन कर.''

- १४७:२- परमेश्वराने त्याच्या लेकरांचे जीवन बांधले आहे.
- १४७:३- प्रत्येकाच्या जीवनाला त्याने आरोग्य दिले आहे.
- १४७:४- त्याने तुम्हाला नावानिशी बोलावले आहे आणि तो तुमच्यावर प्रेम करतो.
- १४७:५,६- तो आम्हाला शिक्षण देतो आणि तो आमचे जीवन उंच उचलतो.
- १४७:९- तो आम्हाला आमची रोजची भाकर देतो आणि आम्हाला खाऊ घालतो.
- १४७:१३- तो आमच्या पीढीचे संरक्षण करतो आणि आम्हाला आशिर्वादित करतो.
- १४७: १४- तो आम्हाला शांती देतो.

म्हणून आपले मुख त्याच्या स्तुती विषयी सांगो, 'प्रभू धन्यवादित असो, तो प्रतिदिनी आमचा भार वाहतो, देव आमचे तारण आहे.' (स्तोत्र. ६८:१९)

तुमचे नाव जीवनाच्या पूस्तकामध्ये लिहले आहे:

अतिप्रिय सेवाकार्य भागीदारांनो, मागील वर्षांतील सेवाकार्य वाढीसाठी, तुम्ही प्रार्थना केली आणि आनंदाने दिले. तूम्ही त्यासाठी काम केले आणि तूमची नाव जीवनाच्या पूस्तकामध्ये लिहिण्यात आली. तुम्ही अनंतकाळासाठी सन्मानास पात्र आहात. तुमच्याद्वारे जो प्रत्येक पापी पश्चाताप करतो त्याच्याद्वारे स्वर्ग आनंद करतो. नवीन चर्च उभारण्यात आले आणि प्रभू येशू ख्रिस्ताचे नाव गौरविण्यात आले हालेल्लूया !

स्तुती असो. ६७३१ पवित्रशास्त्र अभ्यास गटामध्ये १,१४,४४५ विश्वासणारे नियमितपणे देवाचे वचन शिकत आहेत. मागील दहा महिन्यांदरम्यान ६८१० लोकं त्यांच्या विश्वासाच्या कबूलीद्वारे नवीन उत्पत्ती आहेत. १०,८५७ लोक त्यांच्या नवीन विश्वासाच्या कबूली साठी तयार होत आहेत. आतापर्यंत ८३२६ गावांना सुवार्ता सांगण्यात आली. तुमच्या सर्व प्रिय प्रार्थना आणि देणग्यांबद्दल आम्ही तुमचे आभार मानतो. परमेश्वर तुम्हाला भरपूरीने आशिर्वादित केले.

या आर्थिक वर्षाचा शेवटचा एक चतुर्थांश :

आर्थिक वर्षाचे उर्वरित महिने जे ३१ मार्च, २०२० च्या शेवटी पर्यंत येणार आहेत, ते निर्णायक स्वरूपाचे आहेत. ध्येय गाठण्यासाठी आम्ही प्रमोशनल वर्क आणि क्षेत्रीय काम वाढवत आहेत. आमच्या प्रार्थनेची वेळ दूप्पट करण्याचे हेच ते दिवस आहेत. बचत बॉक्स धारकांनी त्यांच्या समर्पित. देणग्या वेळेवर पाठविण्याची प्रतिज्ञा घेतली आहे. जे गावांना सहकार्य करतात त्यांना नाताळ भेटीसह ते दुप्पट करण्याद्वारे त्यांच्या देणग्या पाठवायच्या आहेत. हीच ती वेळ आहे की जेव्हा आपण आपल्या विशेष देणग्या देऊन 'स्वर्गीय कामा' मध्ये गुंतवणूक करू शकतो. हा युध्दाचा समय आहे जेथे क्षेत्र सेवक वेगाने धावतात आणि जे सैतानाच्या बंधनामध्ये आहेत त्यांना सोडवतात. क्षेत्रीय मंडळया नवीन विश्वासणाऱ्यांनी भरल्या आहेत आणि या काळा मध्ये स्तुतीच्या ध्वनी वाढत आहे. ही ती वेळ आहे जेथे तुमच्या अश्रूंच्या फायदयाची कापणी आपण करू शकतो. या आपण त्वरीत हालचाल करू.

नवीन वर्ष २०२० मध्ये आमचा दृष्टांत लवकर घडून येण्यासाठी प्रार्थना करा:

भारताच्या एक लाख गावांमध्ये सुवार्ता नेण्याच्या योजनेवर आम्ही काम करत आहोत, परंतू दृष्टांत पूर्ण करण्यासाठी उणीव आहे. आमची आर्थिक स्थिरता आणि इतर कारण आमच्या सेवाकार्याच्या वाढीवर परिणाम करत आहेत. जरी परिस्थिती मदतयुक्त असली किंवा नसली तरी आम्ही दृष्टांतासह पुढे चालत आहोत. आम्हाला तुमच्या मोठया ओझ्यासह प्रार्थनांची आवश्यकता आहे. रोम १०:१४ व १५ नुसार आपण त्या लोकांसाठी प्रार्थना केली पाहिजे जे पाच वेगवेगळया कामगिरी मध्ये सहभागी आहेत.

पाठवणारे: जे प्रार्थनांसह व आर्थिक सहकार्यासह सेवकांना कापणीसाठी पाठवतात ते सेवाकार्य भागीदार ते पहिल्या पातळी मध्ये उभे राहतात. प्रार्थना करा की त्यांचे कूटूंब आणि त्यांच्या हातचे काम आशिर्वादित व्हावेत. प्रार्थना करा की साक्षीमय जीवनात उत्तम आरोग्यासह चालण्यासाठी आणि त्यांच्या समर्पित दानांद्वारे सुवार्ता कार्याला सहकार्य करण्यासाठी परमेश्वराने त्यांना कृपा पूरवावी.

उपदेश देणारे: ते त्यांच्या स्वत:च्या लोकांना देवाच्या मेंढवाडयात आणण्यासाठी रात्रंदिवस कष्ट घेतात. प्रभू येशू ख्रिस्ताला केंद्रस्थानी ठेऊन ते देवाच्या वचनाचा उपदेश करतात. ते सुवार्ता कार्यामध्ये नको असलेले भांडण टाळतात. ते नम्रतेच्या चित्तवृत्तीने काम करतात. ते विरोध पाहणे कधी सोडत नाहीत परंतू पिक वाढवण्यासाठी काम करतात. कधीकधी ते आजारपण, अपघात आणि मरण यांचा सामना करतात जे त्यांच्या कूटूंबावर परिणाम करतात याकरिता आपण त्यांच्यासाठी प्रार्थना केलीच पाहिजे.

ऐकणारे: ते वेगवेगळया परिस्थिती मध्ये जीवंत देवाचे वचन ऐकत असताना आपण त्यांच्यासाठी प्रार्थना करणे गरजेचे आहे. त्यांनी त्यांच्या अंत:करणामध्ये विश्वास ठेवायला हवा आणि त्यांच्या संपूर्ण परिवाराचे चमत्कार आणि अद्भूतांद्वारे तारण व्हायला हवे. त्यांचे आत्मिक नेत्र उघडे असायला हवेत आणि त्यांचे अंत:करण व घर असे ठिकाण असायला हवे जेथे प्रभू येशू ख्रिस्त चमकेल.

विश्वासणारे: प्रार्थना करा की ख्रिस्तामधील नवीन विश्वासणारे देवाच्या वचनात मुळावल्या जावेत आणि त्यांनी समस्यांमध्ये व आव्हानांमध्ये फख दयायला हवे. ते परिवारामध्ये आणि समाजामध्ये धैर्याने उत्तम साक्षीदार असावेत.

आराधकः नवीन विश्वासणारे ज्यांनी त्यांच्या नवीन विश्वासाची कबूली दिली, ते प्रभूभोजन व परमेश्वराच्या आराधनेद्वारे सातत्याने चर्च मध्ये उपस्थित राहतात. व प्रार्थना करा की त्यांनी सेवाकार्यासाठी समर्पणाने दयावे आणि शिष्य म्हणून इतरांना सुवार्ता सांगावी व आत्मिकरीत्या वाढावे.

परिपूर्ण करण्यासाठी २०२० चे ध्येयः

* २००० नवीन सेवकांसाठी प्रशिक्षण
* १०,००० नवीन गावांमध्ये सुवार्ता पोहचावी.
* १०,००० नवीन प्रार्थना गट आणि मंडळया ज्या सहकार्य करतील.
* १००० स्वंयसेवी प्रतिनिधी जे सेवाकार्याला पूढे नेतील.
* ६.५ करोड प्रत्येक महिन्याला सेवाकार्यासाठी आवश्यक आहेत.
* क्षेत्रांमध्ये प्रत्येक महिन्याला सरासरी १२ समर्पण सभा

* प्रार्थना करा की २८४१ भक्ती गट प्रत्येक महिन्याला विश्वासाच्या कबूलीच्या सभा पाहतील. ध्येय परिपूर्ण करण्यासाठी प्रार्थना करा.

आम्ही अभिवादन आणि प्रार्थना करतोः

ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कमिटीच्या वतीने मी त्यांच्यासाठी माझे आभार वाढवतो ज्यांनी भारताच्या ज्या गावांनी अजून एकदाही सुवार्ता ऐकली नाही त्यांच्यासाठी प्रार्थना केली व उदारतेने सहकार्य केले. चर्चचे पाळक, वडीलधारे, विश्वासणारे, सहकर्मचारी, प्रतिनिधी आणि ते सर्व ज्यांनी प्रेम आणि सहभाग दाखवला त्यांचे मी आभार मानतो. अलमाईटी गॉड, चेन्नई येथील पाळक जोसेफ थाड्डाएअस ज्यांनी २०.१०.२०१९ रोजी देवाचे वचन सांगण्याची संधी दिली त्यांचे मी आभार मानतो. सि. एस. आय. हॉकर मेमोरिअल चर्च, मुलाचेल येथील रेव्ह. टी. जॉन पिटर यांचे देखील मी आभार मानतो ज्यांनी २५,२६, व २७ या तीन दिवसांसाठी विश्ववाणी मिशनरी कॅम्प घेण्यासाठी जागा दिली. सि. एस.आय. कन्नूर पास्टरेट येथील रेव्ह. वाय. लॉरेन्स यांचे देखील आम्ही आभार मानतो. आमचे सेवाकार्याचे पुढारी रेव्ह. रोशन, रेव्ह. आशानंदा लिमा आणि रेव्ह. पौलस पवार, सहकारी आणि विश्वासणाऱ्यांबरोबर आम्ही हिमालयाच्या सिलीगुडी मध्ये ऑक्टोंबर २९ ते ३१, हिमाचल प्रदेश प्रार्थना शिबिरामध्ये आशिर्वादित समय प्राप्त केला. लिव्हिंग स्टोन ए.जी.चर्च, पोरूर, चेन्नई चे रेव्ह. जेयाकूमार ज्यांनी १०.११.२०१९ रोजी देवाचे वचन सांगण्याची व सेवाकार्याबद्दल माहिती देण्याची संधी दिली. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. १७.११.२०१९ रोजी सि.एस. आय. चर्च, थर्मल नगर, तुतीकोरीन येथे देवाचे वचन सांगण्यासाठी परमेश्वराने मला सक्षम केले. मी रेव्ह. जेयासिंग यांचे आभार मानतो ज्यांनी मोठया प्रमाणात आम्हाला सहकार्य केले.

याशिवाय, ज्या १००० गावांनी या वर्षामध्ये ख्रिस्ताला ओळखले नाही त्यांच्या पर्यंत स्थानिक सेवकांना पाठवण्यासाठी तुतीकोरीनचे प्रतिनिधी व सेवक प्रार्थना पूर्वक त्वेरेने काम करत आहेत. त्यांच्या कष्टांचे मी कौतूक करतो. सर्व प्रतिनिधी, सेवक जे नाताळचे बक्षीस जमा करण्यासाठी कष्ट घेत आहेत आणि सेवाकार्याचे भागीदार सुध्दा जे उदारतेने देतात त्या सर्वांना मी शुभेच्छा देतो व त्यांचे आभार मानतो. सर्व वेगवेगळया प्रभागातील सहकारी, प्रशासकीय समिती सदस्य आणि नेटवर्क चेअरमन पी. सेल्वराज अन्नन यांचे मी अभिवादन करतो.

''पाहा, मी तुझ्यापूढे दार उघडून ठेवले आहे, ते कोणी बंद करू शकत नाही.'' (प्रकटी. ३:८)

चेन्नई

२७.११.२०१९

ख्रिस्तामधील तुमचा बंधू

डब्लू. विल्सन ग्यानकूमार

महाराष्ट्र राज्य स्तरीय संम्मेलन, कन्याकुमारी, २२,२३,२४ नोव्हेंबर - २०१९

प्रभू येशूच्या नावाला आम्ही धन्यवाद देतो प्रभूने आम्हाला २२,२३,२४ नोव्हेंबर-२०१९ रोजी १५ वे महाराष्ट्र राज्य संम्मेलन कन्याकुमारी येथे घेण्यासाठी साहाय्य केले जे मुंबई पासून १९०० कि.मी. अंतरावर व भारताच्या नकाशातील सर्वात शेवटच्या टोकातील मुख्य ठिकाण आहे. जे तिन्ही बाजूने समुद्राने घेरलेले आहे. एक मोठे पर्यटन स्थळ आहे जेथे तीन समुद्राचा संगम पहायला मिळतो.

महाराष्ट्रातील जवळपास २९ जिल्हयातुन ४०२ प्रतिनिधी आले होते. सि.एस.आय सेंटर हॉलमध्ये तिन्ही दिवसांच्या सभा घेण्यात आल्या. बिशप पौलस पवार, रेव्ह. भक्त वत्सलम (हैद्राबाद), रेव्ह. गॅब्रीएल घंटा, बंधू. मार्क नवले, रेव्ह. प्रकाश गद्रे हयांनी वचनाची सेवकाई केली.

दुसऱ्या दिवशी प्रतिनिधी द्वारे खेडे दत्तक घेण्याच्या योजनेत अनेकांनी भाग घेऊन ५१ गावे दत्तक घेण्यात आली. बंधू. मार्क नवले व बंधू. भास्कर गोरडवार हयांच्या नेतृत्वाखाली सुंदर स्तुती व आराधना घेण्यात आली. तसेच बंधु. रवि म्हस्के हयांनी सुंदररित्या भाषांतर केले. शेवटच्या दिवशी सोलापूर येथील एका प्रिय प्रतिनिधीद्वारे महाराष्ट्रातील सर्व सेवकांना सुंदरशे बक्षीस देण्यात आले. जेवणाची व राहण्याची उत्तम सोय हया वेळेस झाली. विशेष म्हणजे ८०% प्रतिनिधी हे सर्व नवीन आले होते.

तिसऱ्या दिवशी प्रभूभोजन व आराधना घेण्यात आली, तसेच अनेक प्रतिनिधींनी अभिप्राय दिले. जे उत्तम आणि चांगले होते. स्टेट ऑफीस च्या सर्व सेवकांनी तसेच रेव्ह. सुनील दुर्वे हयांनी जे अथक परिश्रम घेतले त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. रेव्ह. रमेश इंगळे हयांनी उत्तमरित्या चालकपण केले.

डॉ. एमिल जेबासिंग अन्नन यांचे डिसेंबर 2002 समर्पण अंकातील मुख्य आकर्षणः

नऊ लोक कोठे आहेत?

मत्तय ७:७ मागा
लूक १७:१७ धन्यवाद दया

तेव्हा येशूने म्हटले,''दहाचे दहा शुध्द झाले होते ना? मग नऊ जण कोठे आहेत?

ते मागण्यासाठी धावत आले, प्राप्त करण्यासाठी ते त्वरीत आले.
त्यांनी जे मागितले होते ते मिळवल्यानंतर, ते दिसेनासे झाले, ते ज्यांची येशूच्या दृष्टीने पाहण्याची इच्छा होती, ते जगात गायब झाले होते.

ज्या हातांनी स्विकारले ते आराधना करणारे हात बनले नाहीत. ज्या मुखाने मागितले त्याने ओठांची स्तुती प्रकट केली नाही. ते शरीर जे बालकाच्या त्वचेप्रमाणे बनले ते ज्याने त्या शरीराला बदलले त्याच्या चरणावर अर्पिण्यात आले नाही. ते दहा होते. सर्व कुष्ठरोगी होते. नऊ यहुदी होते आणि एक शोमरोनी होता. यहुदी आणि शोमरोनी कधीही एकत्र राहत नव्हते कुष्ठरोगाने त्यांना एकत्र केले. जेव्हा आजारपण, संकट, युध्द आणि भूकंप घडतात, यांसारख्या गोष्टी मनुष्याद्वारे नियंत्रणात आणल्या जात नाहीत.

तेव्हा मनुष्य जात, धार्मिक वादविवाद आणि उच्च नीचतेचा भेदभाव विसरतो व एकत्र केल्या जातो. जेव्हा तो सुस्कृतपणे जगतो, जेव्हा त्याला मोठया खुर्च्या प्राप्त होतात, तेव्हा तो देवाला आणि इतरांना विसरतो. त्याची संपूर्ण विचारसरणी म्हणजे तो स्वतः
दहा लोक धावत आली सर्व दहा खिन्न उभे होते. त्यांनी कुष्ठरोगापासून सुटका मागितली. त्यांनी येशूच्या चेहऱ्याकडे पाहत मागितले त्यांनी येशूच्या चरणावर पडून मागितले.
मत्तय ७:७ म्हणते, मागा म्हणजे तुम्हास दिले जाईल.
योग्य अर्थ म्हणजे मागत रहा

मी एक दिवस, एक आठवडा, एक महिना, एक वर्ष मागितले परंतू, परमेश्वराने माझ्या प्रार्थनेचे उत्तर दिले नाही. प्रार्थना करण्याचा काय उपयोग? असे लोक आहेत ज्यांनी आपल्या प्रार्थनेच्या चटया गुंडाळून ठेवल्या आहेत. त्याच वेळेस असे लोक आहेत जे न थांबता व न थकता रात्रंदिवस त्यांच्या अंतःकरणामध्ये पाहत आहेत. असे लोक होते, ज्यावेळेस ते प्रार्थना करायचे त्यावेळेस त्यांचे ओठ हालायचे.

मत्तय ७:७ मागा, जर तुम्ही तुमच्या प्रार्थना सोडल्या असतील किंवा प्रार्थना करण्याचा काय उपयोग आहे असे निराश होऊन आपल्या अंतःकरणात म्हणत असाल जे हे वाचत आहेत, त्यांना परमेश्वर सांगतो.
माझ्या मुला, मुली जो प्रार्थना ऐकतो तो उत्तर देईल, तो तुम्हाला काय मागतो प्रार्थना करत रहा,

हे तुमची आवड तपासण्यासाठी नाही तर तुमचा विश्वास वाढवण्यासाठी आहे जे न थांबता प्रार्थना
करतात ते मर्यादेपेक्षा जास्त प्राप्त करतील.
इतर नऊ लोक कोठे आहेत?

देवाने सर्व दहा लोक अपेक्षिले होते, नियमशास्त्रात सांगितल्याप्रमाणे सर्व दहा जणांनी स्वतःला याजकाला दाखविले आणि त्यांना हे प्रमाणपत्र मिळाले की हे जे बाहेर राहत होते ते आता गावामध्ये राहू शकतात कारण ते बरे झाले आहेत, येशूने अशी अपेक्षा केली होती की ते सर्वजण ते प्रमाणपत्र दाखविण्यासाठी प्रथम त्याच्या कडे धावत येतील.

परंतू प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतर ते प्रमाणपत्र मिळण्याचा जो कारण होता त्यालाच विसरण्यात आले.वरती चढल्यानंतर, त्यांनी त्यांच्या पायांनी शिडीला लाथ मारली. ढेकर दिल्यानंतर त्यांनी पाहिले देखील नाही की कोणी जेवण बनवले आणि कोणी त्यांना खाऊ घातले. नऊ लोक दुर पळून गेले. बरे होण्यासाठी ते येशुकडे धावले.बरे झाल्यानंतर ते येशू पासून पळाले.

जे येशू पासून पळतात, ते कोठे पळतात? जग, देह, वासना, सैतान आणि पाप १० बरे झाले. नऊ यहुदी होते आणि एकजण शोमरोनी होता. नऊ यहुदी दुर पळाले ते वासनेमध्ये पडले.

देवाला गौरविण्यासाठी जे नियमांमध्ये उत्कृष्ट होते ते मागे राहिले बाहेरचा शोमरोनी पुढे आला.

शिकलेल्यांनी जे केले नाही ते अशिक्षिताने केले. त्यांच्या आजाराने त्यांना एकत्र केले, परंतू त्यांच्या आरोग्याने त्यांना विभक्त केले. दुष्ट योजना जोडते आणि पैसा विभक्त करतो. आज देखील स्वर्गदुतांच्या मुखामध्ये न संपणारी स्तुती आहे. परंतू ज्याला निसर्गाच्या सान्निध्यात निवारा आहे. त्याच्या मुखामधून परमेश्वरासाठी स्तुती नाही.ज्याने दिले आहे त्याचे स्मरण जे ठेवत नाहीत ते दुष्ट आहेत. ज्यांनी त्यांना उभ केल त्याच्यासाठी जे उभे राहत नाहीत ते उध्दट आहेत. जेव्हा
स्तुती कमी होते, तेव्हा सर्वकाही ऱ्हास पावते. क्षीण होणाऱ्या दहा जणांचा नाश होणार होता, परंतू येशू त्यांच्यापर्यंत पोहोचला त्याने त्यांना सौंदर्य देऊ केले आणि त्यांना याजकांकडे पाठविले.

आरोग्य, सौंदर्य, रूबाबदारपणा, संधी, हास्य सर्व १० जणांनी जीवनाचा उपभोग घेतला. परंतू एकाला वगळता नऊ जण ज्याने हे दिले त्याला विसरले.

वचन सांगते, जे येशूचे नाव विसरले आणि ज्यांनी ते नाकारले त्यांना लज्जित करण्यात येईल. होय नऊ जण जे बरे झाले ते लज्जित झाले एका प्रसिध्द धर्मशास्त्रज्ञाने सांगितले की नऊ लोक पुन्हा लज्जा, भय, गावाबाहेर राहणे, आरोग्य प्राप्त करण्याअगोदर जसे ते स्वतःला आच्छादायचे तसे अच्छादणे अशा परिस्थितीत आले.

इतिहासानुसार दहा पैकी नऊ जण जे आभार मानण्याचे विसरले, त्यांनी त्यांचे आरोग्य गमावले. कुत्रे त्यांच्या शेपटया हलवतात आम्ही आमच्या हाताच्या घडया करतो. सकाळी कावळे ओरडून स्तुती करतात आपण अश्रूंनी स्तुती करतो. लाटा गर्जना करत स्तुती करतात आपण तुटलेल्या अंतःकरणाने स्तुती करतो.

स्तुती धन्यवाद दया तुम्ही जे मिळवले आहे ते कधीही गमावणार नाही. तुम्ही मर्यादेपेक्षा जास्त अधिकाधिक प्राप्त कराल. स्तोत्र.१०३ पाठ करा पहिली पाच वचन सकाळी झोपेतून उठल्यापासून रात्री झोपे पर्यंत ही पाच वचनं तुमच्या अंतःकरणात म्हणत जा. तुमची मिळकत वाढेल तुमच्या अंतःकरणाच्या इच्छा परिपूर्ण होतील प्रभू येशू ख्रिस्ताला कोणताही धर्म किंवा जात नाही. तेथे कोणताही धार्मिक भेदभाव नाही तो कधीही चेहरा किंवा रंग पाहत नाही. जो कोणीही येशूच्या नावात मागतो, जो कोणीही स्तुती करतो त्याला तो देईल आणि देत राहिल.

परंतू प्राप्त केल्यानंतर तुम्ही येशूचे आभारी राहिला नाहित तर तुम्ही जे काही प्राप्त केले आहे ते एक एक करून गमवाल. दहा कुष्ठरोगी बरे झाले होते परंतू एकाचेच आरोग्य टिकले, राहिलेल्या नऊ जणांना त्यांचा कुष्ठरोग मिळाला. कारण हे की ते नऊ जण येशूच्या चरणाजवळ आले नाही.

येशूची अपेक्षा त्यांनी पूर्ण केली नाही. जे त्यांना हवं तसं जगतात त्यांना देव उत्तम ते देत नाही जे त्यांना हव तस भटकतात त्यांचा देव सन्मान करणार नाही.

जे येशूची स्तुती करतात ते काहीही गमावणार नाहीत. जे येशूची स्तुती करत नाहीत ते कधीही उभे राहणार नाहीत.

'हे माझ्या जिवा, परमेश्वराचा,

धन्यवाद कर' हे माझ्या सर्व अंतर्यामा, त्याच्या पवित्र नावाचा धन्यवाद कर हे माझ्या जिवा परमेश्वराचा धन्यवाद कर त्याचे सर्व उपकार विसरू नको (स्तोत्र. १०३:१-२)

एक प्रार्थना

प्रभू येशू ख्रिस्त जो देव आणि तारणारा आहे, जेव्हा तुझी स्तुती करण्यास आम्ही उणे पडलो आमची मुखं स्तुतीने नाही तर रागाने भरली गेली. आमची अंतःकरण आनंदाने नव्हे तर ओझ्याने जड होती. जेव्हा आमचे अंतःकरण चेचण्यात आले ज्यावेळेस आम्हाला आमच्या चुकांची जाणीव झाली आणि आम्ही तुझी स्तुती केली. आम्ही जे काही गमावले होते ते आम्ही प्राप्त केले आमच्या कुटूंबाने शांती आणि आनंद प्राप्त केला. जो स्तुती मध्ये वास करतो, चांगुलपणा आणि दया सर्व दिवस आमच्या मागे असो जो पर्यंत आमचे जीवन आहे तोपर्यंत माझे अंतःकरण तुझी आराधना करेल.

जाणून घ्या

प्रभू येशू ख्रिस्त जो देव आणि तारणारा आहे, जेव्हा तुझी स्तुती करण्यास आम्ही उणे पडलो आमची मुखं स्तुतीने नाही तर रागाने भरली गेली. आमची अंतःकरण आनंदाने नव्हे तर ओझ्याने जड होती. जेव्हा आमचे अंतःकरण चेचण्यात आले ज्यावेळेस आम्हाला आमच्या चुकांची जाणीव झाली आणि आम्ही तुझी स्तुती केली. आम्ही जे काही गमावले होते ते आम्ही प्राप्त केले आमच्या कुटूंबाने शांती आणि आनंद प्राप्त केला. जो स्तुती मध्ये वास करतो, चांगुलपणा आणि दया सर्व दिवस आमच्या मागे असो जो पर्यंत आमचे जीवन आहे तोपर्यंत माझे अंतःकरण तुझी आराधना करेल.

२०२० सालातील प्रार्थना मंदिर बांधण्याची योजना

गावांचे नाव	जिल्हयाचे नावे	सेवकांचे नावे
१. रोवा	भंडारा	बंधु.पराग मामिडवार
२. चांदुरी	भंडारा	बंधु. विवेक तागडे
३. सुकडी	गोंदिया	बंधु.सचिन चुधरी
४. खराडबारी	धुळे	बंधु. दिनेश देसाई
५. वाघोली	अहमदनगर	रेव्ह. रमेश गावीत
६. देगलूर	नांदेड	रेव्ह. नागनाथ सुर्यवंशी

चिन्ह!

आम्ही आमचा कॅमेरा आणि इतर साधनांसह जेव्हा सुर्य प्रखररीत्या चमकत होता त्यावेळेस सकाळी डोंगर चढायला सुरूवात केली. आमच्या प्रवासाला एक विशेष उद्देश होता त्याच वेळेस आम्हाला असे सांगण्यात आले की हे धोकादायक आहे. आम्हाला अगोदरच डोंगर चढण्याचा व जंगलांचा अनुभव असल्याने तसेच आमचे त्याबाबतचे प्रशिक्षण झालेले असल्याने, आम्ही न घाबरता चढलो. निसर्ग लांबून सुंदर दिसतो परंतू जेव्हा आपण जवळ जातो तेव्हा तो भयानक असतो.

जेव्हा आपण समुद्र किनारी उभे राहतो व आपले पाय भिजवतो तेव्हा आपल्याला समुद्र शांत वाटतो. त्याच वेळेस जेव्हा आपण मासे पकडायला खोल समुद्रात जातो, ज्यांना अनुभव आहे त्यांना वगळता हे भीतीदायक आहे. जर आपण थोडे जरी निसटलो आणि पाण्यात धडपडू लागलो, तर मग आपले जीवन भयावह बनते. डोंगर आणि जंगल देखील तसेच आहेत, ते लांबून सुंदर दिसतात, परंतू जसे आपण जवळ जातो ते आपल्यामध्ये मोठे भय निर्माण करतात.

अरण्यांचा सुगंध, झऱ्यांचा आवाज आणि सिंहांच्या शेपटीची खोड काढणारे माकडे अशा देवाच्या निर्मितीचे गुणगान करत आम्ही पूढे चालत राहिलो. आम्हाला डोंगरावर सरळ उभे १३ कि.मी. चढणे गरजेचे होते.
काही किलोमीटर नंतर आमचे हात पाय थरथरू लागले. हे जणू काही सुरूवातीच्या पातळीप्रमाणे असेल. प्रत्येकाला ठाऊक होते जेव्हा आम्ही वरचढ होऊ तेव्हा आम्ही इच्छित स्थळी पोहचू. आम्ही निर्मळ स्वच्छ झऱ्यातुन पाणी प्यालो, आम्ही आमच्या चेहऱ्यावर पाणी मारले, आम्ही आमचे चेहरे भिजवले आणि आम्ही न थांबता पूढे चालत राहिलो.

एका विशिष्ट ठिकाणी गाईड ज्याने आम्हाला नेले होते त्याने आम्हाला थांबायला सांगितले. हे असे दिसत होते की हे सुरक्षित ठिकाण आहे. आमच्या हातात असलेले नाश्त्याचे पाकीटं आम्ही उघडले. हत्ती सारखी भूक लागलेली असताना हलका नाश्ता असे ते होतं मग आम्ही थोडा वेळ आराम केला.
आमच्या भोवताली असलेली झाडं पाहण्यासाठी मी माझे डोळे फिरवले. तेव्हाच माझ्या हे निर्दशनास आले की एका झाडाची फांदी आत्ताच तुटली आहे ज्यावेळेस मी त्याविषयी गाईडला विचारले, तो म्हणाला की आत्ताच एका हत्तीने हे तपासून पाहिले की हे झाड खाण्यालायक आहे की नाही.
हत्ती तिथेच उभा आहे का असा प्रश्न विचारत असताना त्याने सकारात्मक उत्तर दिले. जेव्हा नजीकचे इतर झाडं पाहिले, मी अनेक चिन्ह पाहिले, नळांच्या खुणा आणि विचलित झालेली झाड. गाईडने उत्तर दिले की काही प्राणी त्यांच्या नखांनी झाडांवर खुणा करतात.
त्या झाडाकडे आणि त्यांच्या हद्दीमध्ये पुन्हा परत येणासाठी ते मदतपूर्ण असते.
हे माझ्यासाठी अद्भूत आणि आश्चर्यमय होते.

चिन्ह हा शब्द माझ्या अंत:करणात ठळकपणे चिकटला:

मनुष्याला चिन्हाची गरज असते कधी कधी आपण कोठपर्यंत पोहोचलो हे जाणण्यासाठी आपल्याला मैलाच्या दगडाची आवश्यकता असते. जर काही रस्त्यांवर चिन्हाचे फलक नसतील तर आपला प्रवास अवघड बनतो.

आपल्याला दृष्टांत किंवा आपली ओळख काय आहे हे ध्येय असे पर्यंत आणि जोपर्यंत आपण ते जाणतो तोपर्यंत आपले जीवन वाऱ्याने उडून जाणाऱ्या भूसाप्रमाणे असते, आपण अनेक लोकांना भेटतो ज्यांना त्यांच्या ओळखीमध्ये समस्या आहे.

आपण अनेक लोकांना भेटतो ज्यांनी बहुमुल्य सेवाकार्य सोडले आणि ते ओळख व सन्मान याचा शोध घेत आहेत. आपण केवळ प्रार्थना करू शकतो की परमेश्वर त्यांना ख्रिस्त त्यांचे चिन्ह बनवून त्यांच्या दृष्टांताची त्यांना जाणीव करून देईल.

एदेन बागे मध्ये पूर्वीच्या मनुष्याला त्याच्या आज्ञाभंगाचे परिणाम म्हणून लज्जा, अपमान, घाम, राग, मरण आणि अश्रू यांद्वारे शिक्षा करण्यात आली.

या सर्वांपेक्षा वरचढ शिक्षा म्हणजे ते देवासोबतचे त्यांचे नातेसंबंध गमावतात. तोपर्यंत मानव देवासोबत मित्राप्रमाणे बोलत असे.

जेव्हा त्याने पाप केले, तो भयाने ग्रासल्या गेला आणि देवाला सामोरा जाऊ शकेना. त्याला पळावे लागले आणि स्वत:ला लपवावे लागले.

परंतू ते नातेसंबंध गमवायला परमेश्वर तयार नव्हता. जरी ज्या मनुष्याला त्याने सुंदररीत्या बनवले होते. त्याने त्याचे ऊर भोसकले, तरी त्याने त्यांच्यावर प्रेम केले. हे एक पित्याचे हृदय आहे. हे एक पित्याचे महान प्रेम आहे. त्याने असा विचार केला असता की मनुष्यासोबत कोणतेही वैयक्तिक नातेसंबंध न ठेवता त्याला थोडे दूर ठेवावे एक तत्काळ शिक्षा म्हणून त्याने आदामाला घाम दिला, तसेच त्याला कष्टाने काम करून खायला सांगितले.

त्याने हवेला कूटूंब वाढवण्यासाठी प्रसुती वेदना देऊन शिक्षा केली. तरीही तो प्रेम करतो. तो कृपेने भरलेला आहे ज्यांना त्याने निर्माण केले त्यांच्यावर प्रेम केले. त्याने काईना बरोबर झगडा केला, ज्यावेळेस काईन म्हणाला ज्या कोणाला मी सापडेन तो मला ठार करील त्यावेळेस देवाने त्याच्या कपाळावर एक चिन्ह ठेवले.

ते संरक्षणाचे चिन्ह होते. नोहाचा परिवार वगळता संपूर्ण जगाचा नाश झाला त्याने आभार प्रदर्शन केले. देवाचे हृदय विरघळले.

देवाने करार केला आणि चिन्ह म्हणून मेघधनुष्य ठेवले. त्याने दाखवले की इतक्या भयानक पाण्याने मनुष्यजातीचा मी नाश करणार नाही.

नंतर त्याने अब्राहामाला बोलावले आणि त्याला सुंता करायला सांगितले तो म्हणाला की हे त्याच्या व ज्या लोकांना त्याने निवडले आहे त्यांच्यामध्ये चिन्ह असेल.

देवाने ठरवले मोशच्या नेतृत्वाखाली त्यांची सुटका करायची दुष्काळापासून वाचण्यासाठी जेव्हा ते मिसरात गेले आणि जेव्हा ते तेथे बहुगुणित झाले आणि जेव्हा फारोह जो त्यांना कधी ओळखत नव्हता तो त्यांना त्रास देऊ लागला,

तेव्हा देवाने फारोह समोर चमत्कार म्हणून चिन्ह दाखवले त्या भूमीतून ज्या दिवशी ते बाहेर पडले त्याच्या अगोदरच्या दिवशी दाराच्या चौकटीला रक्ताचे चिन्ह लावण्याचा सल्ला देवाने त्यांना

दिला. होय, रक्ताद्वारे उध्दाराचे ते चिन्ह आहे.
त्याचप्रमाणे, देवाने अनेक चिन्ह दिले आणि मनुष्याला त्याच्याकडे वळवले. संपूर्ण पवित्रशास्त्र चिन्हांनी भरलेले आहे जे मानवाने मानवाला दिले आणि चिन्ह जे देवाने मानवाला दिले आणि देवाने मनुष्याकडून मागितलेले चिन्ह देखील.
असे अनेक चिन्ह, करार आणि मार्गदर्शन आहेत जर आपण प्रश्न विचारला कोणते प्रथम आहे किंवा कोणते अत्यावशक आहे, पवित्रशास्त्रामध्ये असे एक ठिकाण आहे जे हिमालया प्रमाणे बर्फाच्छादित डोंगरांच्या मध्ये उभे आहे. ते ठिकाण कोणते आहे?
थोडा विचार करा. त्या ठिकाणी मनुष्य देवाला चिन्ह मागत नाही आणि देव सुध्दा मनुष्याकडून चिन्ह मागत नाही. उलट देवच मनुष्याला चिन्ह मागण्यास सांगतो, मनुष्य देवाकडे चिन्ह मागण्यास कां कूं करतो.
तो थरथर कापतो की त्याने देवाची परीक्षा पाहू नये. देव त्याच्या निवडलेल्या लोकांवर थेट राज्य करत होता. जेव्हा लोकांनी इतरांप्रमाणे राजाची मागणी केली, देवाने त्यांना त्यांचा पहिला राजा म्हणून उंच शौलाला दिले. परंतू नंतर शौलाला त्याच्या कृत्यांद्वारे खाली पाडण्यात आले. त्याच्यानंतर भूमी राजा दावीद याची स्तुती करण्यासाठी खाली आला, तो देवाच्या मनासारखा असा होता.
त्याने इस्त्राएलच्या महान राज्यावर राज्य केले. त्याचा मुलगा शलमोन याच्यासोबत राज्य पूढे सुरू राहते. नंतर राज्य दोन गटांमध्ये विभागल्या जाते. ते म्हणजे इस्त्राएल आणि यहुदा. त्यांचे बहुतेक राजे दुष्ट होते त्यांनी मूर्तीपूजा केली आणि देवाच्या लेकरांना सैतानाकडे वळवले. आहाज जो यहूदा वंशात दावीदाच्या वंशावळी मध्ये आला त्याच्या काळामध्ये, सिरियाचा राजा रेझीन आणि इस्त्राएलाचा राजा बेकाचा पुत्र रेमालिया, यांचे यरूशलेमे मध्ये युध्द झाले.
ते ते काबीज करू शकले नाहीत. त्या काळामध्ये दावीदाच्या परिवाराने ऐकले की सिरियाचे लोक एफ्राइमी लोकांसोबत आहेत, राजाचे हृदय आणि जे लोक त्याच्या अधीन होते त्यांचे हृदय अरण्यात ज्याप्रमाणे वाऱ्याने झाडे हलतात त्याप्रमाणे त्यांची हृदय हलली. दावीदाचा परिवार घाबरला की त्यांचा नाश होईल, त्यावेळेस देवाने अहाजाला सांगितले, तुझ्या देवाकडून चिन्ह माग, खोल ठिकाणांमधुन किंवा स्वर्गातून ते माग, परंतू अहाजाने प्रतिउत्तर दिले की तो परमेश्वराकडे मागेल आणि त्याची परीक्षा पाहिल. पवित्रशास्त्रामध्ये त्यावेळेस देवाने यशया संदेष्ट्याच्याद्वारे एक मोठे चिन्ह दिले. यास्तव प्रभू स्वतः तुम्हांस चिन्ह देत आहे, पाहा कुमारी गर्भवती होऊन पूत्र प्रसवेल व त्याचे नाव इम्मानुअल (आमच्या सन्निध देव) असे ठेवील. (यशया.७:१४) प्रभू येशू ख्रिस्त हा एक महान चिन्ह आहे जे देवाद्वारे मनुष्य जातीस देण्यात आले. इतर सर्व चिन्ह जीवन विरहित आहे. परंतू मांस आणि रक्तासह असलेले चिन्ह अद्वितीय आहे, येशू! तो अमुल्य वरदान आहे.जे नातेसंबंध तुटले होते ते बेथलेहेम मधील त्याच्या जन्माद्वारे सुरू झाले. त्याने कॅलवरीच्या वधस्तंभावरती ते पूर्ण केले. त्याचे लेकरू बनने ही सर्वोत्तम देणगी आहे. मिशनरी कार्य हे ते कार्य आहे जे त्या लोकांना आणते ज्यांनी त्या सर्वोत्तम देणगीचा अनुभव घेतला आहे.
ज्या परमेश्वराने त्याच्या प्रथम येण्याला शिक्कामोर्तब केले होते त्याने त्याच्या पुस्तकामध्ये त्याच्या दुसऱ्या येण्याविषयी अनेक चिन्ह देखील दिले आहेत.
ही चिन्ह दिसायला सुरूवात झाली आहे, या शेवटल्या दिवसांमध्ये जेव्हा परमेश्वराचे दुसरे येणे स्पष्ट आहे, आपण मिशनरी कार्यासाठी घाई केली पाहिजे.

आम्ही तुम्हाला नाताळाच्या आणि नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा देतो.

-हॅरीस प्रेम, विश्ववाणी मिडिया

कन्याकुमारी राज्य संम्मेलनाचे फोटो

प्रशिक्षणा मध्ये वाढ

ज्या गोष्टी तू पूष्कळ साक्षीदारांसमक्ष माझ्यापासून ऐकल्या त्या इतरांना शिकविण्यास योग्य अशा विश्वासू माणसांना सोपवून दे.''(२ तीमथी. २:२) अधिक फळ प्राप्त करण्यासाठी क्षेत्र सेवकांना प्रशिक्षण देण्यात आले, जेणेकरून उत्तर पूर्व भागात सेवाकार्याने मुळ धरावे आणि सेवाकार्य वाढावे प्रत्येक सेवकाने सेवाकार्यामध्ये पदवी पूर्ण केली आहे. प्रत्येक क्षेत्र पवित्रशास्त्राचे विश्व विद्यालय बनते, जेणेकरून जे सेवक सेवाकार्याला खांदा देणाऱ्या प्रौढांना उभे करतात तसेच छोटया गटाच्या पुढाऱ्यांना स्पष्ट अभ्यासक्रम देण्यात आले. त्रिपूरा आणि हिमालयाच्या टेकडयांतील सेवकांनी प्रशिक्षण पूर्ण केले. कलकत्या मधील ४६ क्षेत्र सेवकांनी त्यांचे बी. एम. एन सुरू केले. त्यांच्यासाठी प्रार्थना करा. क्षेत्र मंडळया द्वारे भाग मंडळया सुरू होवोत सर्व ६६०० गावांमध्ये सुवार्ता प्रसार केल्या जावो.

– आशानंद लिमा.

देवाचे पूत्र

रेव्ह.प्रकाश बी गद्रे महाराष्ट्र स्टेट कोऑडिनेटर

देवाचा पूत्र म्हटला म्हणजे आमच्या समोर एकच प्रतिमा लक्षात राहते आणि ती म्हणजे येशू ख्रिस्त. आणि या नाताळच्या सणाच्या दिवसांमध्ये तो ख्रिस्त आम्ही बहुदा एकाच स्वरूपात वारंवार पाहतो तो म्हणजे गव्हाणित जन्मलेला येशू बाळ व एकाच वचनावर वारंवार आम्ही लक्ष देतो ते म्हणजे मत्तय १:२३ '' पाहा कुमारी गर्भवती होईल व तिला पूत्र होईल आणि त्याला इम्मानुएल हे नाव देतील हया नावाचा अर्थ आम्हाबरोबर देव'' आज आपण सर्वजण त्या पूत्राच्या जन्माचा आनंद साजरा करण्यात व्यस्त आहोत. मत्तय१:२३ मधिल वचन म्हणजे यशया संदेष्टयाची भविष्यवाणी होती जी त्याने त्याच्या ग्रंथात ७:१४ हया वचनात केली होती म्हणजेच अगदी यशया संदेष्टयापासून ते मलाखी संदेष्टयापर्यंत सर्वजण देवाच्या पूत्राची वाट पाहत होते व ही भविष्यवाणी ख्रिस्त पूर्व ७२२ मध्ये केली गेली. व ख्रिस्ताच्या जन्माद्वारे ती पूर्ण झाली. तो देवाचा पूत्र मानवीरूप धारण करून हया जगात आला कुमारी मरिया हिच्याद्वारे गव्हाणीत जन्म घेतला व संपूर्ण मानवासाठी एक आशेचा व उध्दाराचा किरण म्हणून तो आला. तो हया जगात साडेतेहतिस वर्षे राहिला व परत ज्या पित्याकडून तो आला तेथे तो गेला. परंतू एक महत्वाची गोष्ट तो आम्हासाठी करून गेला ती म्हणजे त्याने आम्हाला देवाचे पूत्र बनवले.पवित्र शास्त्र हया संबंधाने खूप महत्वाची गोष्ट आम्हाला विदित करते. जे योहान आणि रोमकराच्या पूस्तकामध्ये आम्हाला पाहायला मिळते. देवाचे पूत्र हया संबंधात तीन महत्वाच्या गोष्टी आम्हाला हया पूस्तकात दिसून येतात.

१. ख्रिस्तावरील विश्वासाद्वारे त्याचे मुले होण्याचा अधिकार:

योहान १:१२ मध्ये वचन आम्हाला सांगते ''जितक्यांनी त्याचा स्विकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला. त्यांचा जन्म रक्त, अथवा देहाची इच्छा, अथवा मनुष्याची इच्छा हयांपासून झाला नाही तर देवापासून झाला.''

कधीकधी अत्यंत वाईट वाटते की लोकांना २०२० वर्षापूर्वी जन्मलेला ख्रिस्त माहित आहे की तो देवाचा पूत्र म्हणून हया जगात आला परंतू आमचा ही जन्म त्याच देवापासून झाला व आम्हालाही देवाचे पूत्र म्हटल्या गेले हे माहित नाही. एक जन्म आईपासून दुसरा ख्रिस्तापासून अनेकांना एकाच जन्माचा अर्थ माहित आहे व तो अनुभवही प्रत्येकाला आहे. परंतू दुसऱ्या जन्माच काय? योहान ३:३ मध्ये येशू एका निकदेम सारखा ज्ञानी मनुष्याला दुसऱ्या जन्माविषयी स्पष्टीकरण देतो. नव्याने जन्मल्यावाचून कोणालाही देवाचे राज्य पाहता येत नाही. आणि म्हणून आमचा परत एकदा ख्रिस्तामध्ये जन्म होणे गरजेचे आहे. पश्चाताप आणि त्यावरील विश्वास हयाद्वारे आम्हाला नवीन जन्म प्राप्त होत असतो. योहान आम्हाला सांगतो त्याचा स्विकार करणे म्हणजे पश्चाताप करणे व त्याच्या नावावर विश्वास ठेवणे हयाद्वारे आम्हाला देवाची मूले होण्याचा अधिकार मिळतो. पूढे तो अगदी स्पष्टपणे स्पष्टिकरण देतो की त्यांचा जन्म रक्त, अथवा देहाची इच्छा, अथवा मनुष्याची इच्छा हयापासून झाला नाही, प्रत्येक प्राण्याचा जन्म हया तीन गोष्टींद्वारे होत असतो, परंतू देवाच्या लेकरांचा जन्म हया गोष्टीला प्राधान्य देत नाही तर तो विश्वास आणि पश्चाताप हया दोन गोष्टीवर अवलंबून असतो. धन्य आहोत आम्ही आम्हालाही ख्रिस्ताप्रमाणे देवाची मुले म्हटल्या गेले.

२. जितक्यांना देवाचा आत्मा चालवत आहे तितके देवाचे पूत्र आहेत:

पौल रोमकराच्या ८ व्या अध्यायात पवित्र आत्म्याप्रमाणे चालणे हया संबंधाने स्पष्टरित्या पौल आमच्याशी बोलतो. ८:१४ मध्ये तो आम्हाला देवाचे पूत्र हया संबंधात स्पष्टीकरण देतो योहान आम्हाला देवाद्वारे जन्म कसा होतो हे सांगतो तर पौल आम्हाला त्या जन्मानंतर आम्ही आमचा आयुष्यक्रम कसा विदित करावा हया संबंधात सांगतो. येशूनेही हया जगात जन्म घेऊन दोन टप्प्यात आपले जिवनक्रम व्यतित केला. १. कौटूंबिक जीवन, २. सामाजिक जीवन तो ३० वर्षे आपल्या आई, वडील, भाऊ, बहीण व नातेवाईक हयांच्याबरोबर राहिला व पूढील साडेतिन वर्षे तो समाजासाठी व संपूर्ण मानवतेच्या उध्दारासाठी जगला ही दोन्ही प्रकारचे जीवन तो जगत असताना देवाचा पूत्र म्हणून संपूर्णपणे पवित्रतेत तो जगला पापाने त्याला स्पर्ष केला नाही कठिण परीक्षेमधून तो गेला सैतानाच्या परिक्षेमधूनही त्याला जावे लागले परंतू तरीही पापाने त्याला स्पर्ष केला नाही. पौल आम्हालाही देवाचे पूत्र म्हणून संभोधित करतो. तो रोम. ८:१४-१६ हया वचनात म्हणतो,

ङ्‘कारण जितक्यांना देवाचा आत्मा चालवीत आहे तितके देवाचे पूत्र आहेत कारण पून्हा भीती बाळगावी असा दासपणाचा आत्मा तुम्हाला मिळाला नाही तर ज्याच्या योगे आपण अब्बा, बापा, अशी हाक मारतो असा दत्तकपणाचा आत्मा तुम्हाला मिळाला आहे तो आत्मा स्वतः आपल्या आत्म्याबरोबर साक्ष देतो की, आपण देवाची मुले आहोत.'' म्हणजेच अगदी हे स्पष्ट आहे की पश्चातापाद्वारे आमचा जन्म देवामध्ये झाला परंतू हया संभ्रमात आम्ही राहू नये की आम्ही मरेपर्यंत आता देवाचे पूत्र झालो. महत्वाचे आहे की जन्म झाल्यानंतर आता त्याचे मुले म्हणून उरलेलं आयुष्य त्याच्या आत्म्याने चालणे. जिवनाच्या शेवटापर्यंत चालणे तरच आम्ही देवाचे पूत्र व त्याचे वारिस म्हणून घोषित केल्या जाऊ आज अनेक जण ख्रिस्तामध्ये जन्म घेतात परंतू पुढे ते सैतानाच्या तावडीत सापडतात त्याच्या हातात जातात व देवाच्या व देवाच्या पासून दूर जातात ते त्याचे पूत्र होऊ शकत नाही परंतू आम्हाला पश्चातापानंतर पवित्र आत्मा मिळतो व त्याच आत्म्यात आम्ही सदैव चालावे जसा ख्रिस्त शेवटापर्यंत पापविरहित जगला. आणि म्हणून जर आम्हाला देवाचे पूत्र म्हणून चालायचे आहे तर शेवटपर्यंत त्याच्या आत्म्याने चालावे जे आम्हाला रोम ८:१-१२ मध्ये शिकायला मिळते. ८:१६ मध्ये पूढे सांगितले आहे ''आणि जर मुले तर वारीसही आहो, म्हणजे देवाचे वारीस, ख्रिस्ताबरोबर गौरव प्राप्त व्हावे म्हणून त्याच्या बरोबर जर दुःख भोगित असलो तरच.'' देवाचे पूत्र होण्यासाठी जे दुःख आमच्या वाटयाला येईल ते ही आम्ही भोगावे ही त्याची इच्छा आहे इयोबा सारखे आम्ही म्हणावे ''देवाकडून फक्त सुख घ्यावे काय, तर दुःख पण घ्यावे.''

३. ख्रिस्ताच्या प्रतिमेप्रमाणे आम्ही बनावे:

देवाचा पूत्र येशू हया जक्षामध्ये देवाच्या इच्छेद्वारे आला व देवाची इच्छा त्याने पूर्ण केली. मग ती गव्हाणीत जन्मलेल्या बालकापासून ते वधस्तंभावरील छळापर्यंत असो, तो त्यामध्ये पूर्णपणे उतरला. आमचा जन्म देवापासून झाला व आम्ही जर पवित्र आत्म्याप्रमाणे चालत आहोत तर हया जगात आता आम्ही जगत असताना ख्रिस्त म्हणून जगावे माझा मी पणा सोडून 'स्व' सोडून आता मी नाही पण ख्रिस्त माझ्या ठायी जगत आहे. माझे संपूर्ण जीवन हे ख्रिस्ताप्रमाणे आहे, देवाने आम्हाला पुत्राची प्रतिमा म्हणून बनवलेले आहे. आम्ही आरशासमोर उभे राहिलो तर आम्ही जसे आहोत तसेच दिसतो पण जगामध्ये देवाचे पूत्र म्हणून जगत असताना लोकांना आमच्या मध्ये ख्रिस्त दिसावा एक सुंदर गीत आहे.

मी कुठेही कसा ही असो ख्रिस्त माझ्यामध्ये तो दिसो.
मृत्युछायेतुनी चालता मी हसावे स्मरूनी तुला
जिंकुनी मृत्युला जो उठे तो प्रभू नेत्री माझ्या दिसो.

माझे बोलणे, वागणे, चालणे हे संपूर्ण पणे ख्रिस्तासारखे असावे ख्रिस्ताची सुवार्ता सांगत असताना आम्ही ही जाणीव ठेवावी की लोकांना आमच्यामध्ये ती सुवार्ता दिसावी तो ख्रिस्त दिसावा, सुवार्ता म्हणजे ख्रिस्ताला प्रगट करणे शब्दाने आणि प्रतिमेद्वारे पौल म्हणतो सुवार्तेमध्ये सामर्थ्य आहे. परंतू प्रतिमेमध्ये ती स्पष्टपणे दिसते. लोकांनी येशूला पाहण्यासाठी आमच्या जीवनाकडे पाहावे, आज अनेक लोकांना ख्रिस्ताची गरज आहे, परंतू ख्रिस्ती लोकांच्या जीवनाकडे पाहून ते ख्रिस्ताकडे येत नाही. आम्ही ती साक्ष बनवू शकत नाही देवाची इच्छा आहे हया जगात आम्ही त्याच्या पुत्राच्या प्रतिमेप्रमाणे बनावं.

नाताळच्या हया आनंदामध्ये आम्ही फक्त देवाचा पुत्र येशू हयाच संबंधात विचार करू नये परंतू आम्ही सुध्दा देवाचे पूत्र आणि कन्या आहोत. हयाचा विचार करावा.

हा नाताळ व नवीन वर्ष आपणांस देवाचे पूत्र होण्यास अधिक सहाय करो.

नेटवर्क चेअरमन यांच्याकडून...

अतिप्रिय भावांनो आणि बहिणींनो,

प्रभू आणि तारणारा येशू ख्रिस्त याच्या नावामध्ये नाताळ आणि नवीन वर्षाच्या तुम्हाला शुभेच्छा ।

२०२० वर्षामध्ये पाऊल टाकण्या अगोदर मी गुडघ्यांवर येऊन स्तुती आणि प्रार्थनासह मागे मागच्या वर्षी कडे पाहत आहे. दिवसा असणारा मेघस्तंभ आणि रात्री असणारा अग्निस्तंभ कधी हालला नाही. जेव्हा आम्ही उत्तम मेंढपाळाच्या चेहऱ्याकडे पाहीले, तेव्हा दया आणि चांगूलपणा आमच्या सोबत होता. माझा जीव आणि मन हे कबूल करते की ''परमेश्वराने माझ्यावर केलेल्या सर्व उपकारांबद्दल मी त्याचा कसा उतराई होऊ ? मी तारणाचा प्याला हाती घेऊन परमेश्वराच्या नावाचा धावा करीन. ''(स्तोत्र. ११६:१२-१३)

पवित्र आत्म्याने १ मे १९८० रोजी एमिल अन्नन यांना विश्ववाणी सेवाकार्य सूरू करण्यासाठी प्रोत्साहित केले. जुलै १५, १९८७ रोजी दिल्ली मध्ये ते विश्ववाणी म्हणून नोंदविण्यात आले. त्या वेळेस केवळ ४२ पूर्णवेळ सेवक होते. रेडिओ सेवाकार्य , रेडिओ सेवाकार्य सूरू करण्यासाठी वेगवेगळया लोकगटांचे क्षेत्र सर्वेक्षण करण्यात आले. त्या आधारे गरजू लोकांना रेडिओ कार्यक्रम देण्यात आले. पाठपूराव्याचे कार्य जेथे लोक देवाचे वचन थेट ऐकण्यासाठी उत्सूक आहेत तेथे क्षेत्र उघडण्यात आले, त्याला अनुसरता सेवाकार्य इतक्या पातळी पर्यंत वाढले की क्षेत्र सेवाकार्य हे प्राथमिक असे आहे.

एमिल अन्नन यांची अनुभवासह असलेली व्यापक सहभागीता आणि भारतीय विश्वासणाऱ्यांच्या प्रार्थना व देणग्या हे सेवाकार्य वाढी मागील कारणे आहेत. आम्ही बचत बॉक्स द्वारे प्राप्त करत असलेल्या वर्गणी द्वारे सेवक वाढू लागले. आणि त्यामूळे पीक देखील वाढले. क्षेत्र सेवकांचे समर्पण करण्याकडे लक्ष देण्याऐवजी गावं दत्तक घेण्याकडे आम्ही लक्ष केंद्रित केले. आम्ही महत्तवपूर्ण गाभाभूत मूल्यांसह पुढे जाऊ ''न पोहोचता आलेली गावं -स्थानिक सेवक- भारतीय सहाय्य. एज्रासाठी सर्व गोष्टी चांगल्या झाल्या 'देवाचा कृपायुक्त हात त्याच्यावर होता' (एज्रा. ७:९) त्याचप्रमाणे येशू ख्रिस्ताचा कृपायुक्त हात विश्ववाणी सेवाकार्यावर होता. आम्हाला अश्रू, संकट, नैराश्य, उंीवा आणि फसवणूक होती, आम्ही ते प्रार्थनेद्वारे पार केले आणि कृतज्ञ अंतःकरणासह आम्ही पूढे गेलो. ही एमिल अन्नन यांची इच्छा होती की राज्य शिबिर, राष्ट्रीय शिबिर, विशेष सभा इ. स्वरूपात विश्वासणाऱ्यांना एकत्र करणे आणि सुवार्ता कार्याचे महत्त्व व विश्वासणाऱ्यांच्या पूर्ण सहभागाचे महत्त्व सांगणे आणि अशा प्रकारे सेवाकार्य पूढे नेण्यात यावे. आज, भारतामध्ये पवित्र आत्मा एक उदाहरण म्हणून सेवाकार्य पुढे नेत आहे. होय, माझा जीव २०१९ साठी आनंद करत आहे. वर्ष २०१९ पूढे आम्ही आशेने पाहत आहोत, आम्ही ध्येयाकडे वाटचाल करत आहोत. ध्येयाविना जीवन हे वाऱ्याने सरकणाऱ्या ढगांप्रमाणे आहे. त्याला हे ठाऊक नसते ते कोठे चालले आहे. आपण पवित्रशास्त्रा मध्ये अनेक लोक पाहतो ज्यांच्याकडे ध्येय होते आणि ज्यांनी त्याप्रमाणे कार्य केले आणि विजय प्राप्त केला. देशाला पूरा पासून वाचवण्यासाठी तारू बांधण्याचे ध्येय नोहाला होते. दुष्काळा दरम्यान इस्त्राएली लोकांना वाचवण्यासाठी योसेफ होता! लोकांना मिसर जी गुलामगिरीची भूमी होती

त्यातून दुधामधाचे प्रवाह वाहणाऱ्या भूमीकडे घेऊन जाण्याचे ध्येय मोशेला होते. स्वतःच्या यहुदी लोकांचे संरक्षण करण्याचे ध्येय एस्तेरला होते! यरूशलेमेचे कोट बांधण्याचे ध्येय नहेम्याला होते! विदेश्यांना सुवार्ता सांगण्याचे ध्येय प्रेषित पौलाला होते. ख्रिस्त येशूच्या ठायी देवाचे जे वरील पाचारण त्यासंबंधीचे बक्षिस मिळविण्यासाठी मर्यादेवरील खूणेकडे मी धावतो. (फिलिप.३:१४) या महान कार्याला देवाने जो प्राथमिक दृष्टांत दिला आहे तो हा आहे की '२०,००० पूर्णवेळ सेवकांद्वारे १ लाख भारतीय गावांसाठी सुवार्ता.' वर्ष २०२० दरम्यान, उत्तर भारताच्या चार राज्यांमध्ये विशेष करून पश्चिम भागामध्ये सेवाकार्याच्या वाढीसाठी व पंजाब मधील सेवकांच्या प्रशिक्षणासाठी पठाणकोट मध्ये एक लर्निंग रिसोर्स सेंटर उभारण्यात यावे, आम्हाला योग्य ठिकाणी २ एकर जमीनीची आवश्यकता आहे. त्यासाठी प्रार्थना करा. श्री म्युनुएल व त्यांचा परिवार यांच्याद्वारे कर्नाटकातील चल्लाकेरे येथे प्रशिक्षण केंद्राच्या बांधकामासाठी जमीन खरेदी करण्यासाठी परमेश्वर आम्हाला सक्षम करत आहे. देवाच्या मार्गदर्शनासाठी प्रार्थना करा. अराक्कू वॅली येथे सेवकांसाठी बायबल कॉलेजच्या बांधकामासाठी आम्ही जागा विकत घेतली आहे. आणि आम्ही योजनेच्या मंजूरीची वाट पाहत आहोत प्रार्थना करा की २०२० च्या शेवटापूर्वी क्लास सुरू व्हावेत. जरी आम्ही अश्रूंच्या दरीतून गेलो, आम्ही असा विचार करतो की दिवस जवळ आहेत जेव्हा परमेश्वर त्याला विहीरी प्रमाणे बनवेल आणि स्तुतीच्या जल्लोषाने आम्ही आमचे गुडघे टेकवतो आणि दृष्टांतामध्ये पूढे वाटचाल करतो.

प्रिय सेवाकार्य भागीदारांनो, तुम्हाला सुध्दा वर्ष २०२० साठी ध्येय आहे. तुमचे प्रथम उद्दीष्ट हे असू शकते की, प्रत्येक महिन्याला विश्वासणाऱ्यांना पाच सेव्हिंग बॉक्सेस देणे आणि त्यांचे दानार्पण जमा करणे आणि सेवाकार्यासाठी आमच्याकडे ते पाठविणे. पुढची मोठी कामगिरी म्हणजे गावे दत्तक घेण्यासाठी प्रत्येक वर्षी पाच कूटूंबाची ओळख करून देणे. कृपया २०२० साठी पूर्ण करण्याकरिता ही कामगिरी स्विकारा. २०२० वर्षामध्ये दक्षिण भारत आणि उत्तर भारतामध्ये प्रशिक्षण केंद्र बांधण्याकरता, बचत बॉक्स धारकांना एकदा ६००/- पाठविण्याची विनंती आहे आणि गावे दत्तक घेणाऱ्यांसाठी विनंती आहे की विशेष दानार्पण म्हणून ३०००/- पाठवावेत. हे दोन्ही प्रशिक्षण केंद्र दिपग्रहाप्रमाणे असतील.

परमेश्वर जो सर्व चांगल्या इच्छा पूर्ण करतो तो तुमच्या अंतःकरणाच्या इच्छा परिपूर्ण करील आणि तुमच्या कुटूंबाच्या सुध्दा सर्व गरजा भागवील.

परमेश्वर तुझा सततचा मार्गदर्शक होईल, तो अवर्षणसमयी तुझ्या जिवास तृप्त करील, तुझ्या हाडांस मजबूत करील. तू भरपूर पाणी दिलेल्या मळयाप्रमाणे होशील, पाणी कधी न आटणाऱ्या झऱ्याप्रमाणे होशील. (यशया. ५८:११)

चेन्नई

०३.१२.२०१९

त्याच्या सेवेमध्ये आपला

पी. सेल्वराज

१२४ भक्तीगट पहिल्यांदाच नाताळ साजरा करत आहेत.

प्रभू येशू ख्रिस्ताने त्यांच्या अंत:करणामध्ये जन्म घेतला आहे याची खात्री प्राप्त करणे, त्यांचा नवीन विश्वास कबूल केलेला असणे. कमीत कमी १० जणांचा गट एकत्र जमतो आणि सोबत उपासना करतो याला भक्तीगट किंवा क्षेत्र मंडळी म्हणतात. पहिल्या पिढीच्या विश्वासणाऱ्यांसोबत नाताळ साजरा करण्यासाठी मोठया उत्साहाने आम्ही तयार होत आहोत. आम्ही साक्ष देत आहोत की असे दिवस समीप आहेत जेव्हा प्रत्येक ठिकाणी आम्ही परमेश्वराची उपासना करू शकू. २५.१२.२०१९ रोजी नाताळाच्या सभेला उपस्थित राहण्यासाठी जेव्हा तुम्ही तयार व्हाल तेव्हा सेवकांच्या नावांची यादी व भक्ती गटाची नावे वाचा आणि परमेश्वराला गौरव दया.

अ.क्रं	गावांची नावे	सेवकांची नावे
	जम्मु काश्मिर	
१	रामबान	संजय भगत
२	चंदरकोटे	संजय भगत
	हिमाचल प्रदेश	
३	गंगाथ	अजय कुमार
४	चिलाला	विधी चांद
५	सादवन	रोहित हंस
६	लगरू	जोगींद्रा पॉल
७	नहाली	जोगींद्रा पॉल
८	गुनीया	प्रकाश चांद
९	जखार	पिंकू राम
१०	पाइसा	गूरूदेव
११	फापू	प्रकाश चांद
१२	खाबल	मिसेस. गुडिया सुनिल
१३	सौंदारी	मिसेस. गुडिया सुनिल
१४	दुंगयानी	विधी चांद
१५	ब्रधा	दिनानाथ
१६	गँगटोली	पिंकू राम
१७	टिकरी	प्रकाश चांद
१८	तुना हटटी	प्रकाश चांद
१९	बडी दा गाला	धर्मेंद्र सिंग
	पंजाब	
२०	पिंडेया	सम्युएल मसीह
२१	तालवांडी विर्क	रॉबिन
२२	पूस्स मंडी	जसविंदर
२३	तलवांडी (मन्ना)	जोगिंदर मसीह
२४	घेरी देवीनगर	विनोद सिंग
	उत्तराखंड	
२५	बिगराबॉग	सार्विंद सिंग राना
२६	अलजानिया	सुरज सिंग
२७	सुनकारी-२	अमित सिंग राना
२८	बिसौता	अशोक कुमार
२९	भुरा/सिकालपटटी	अजित सिंग राना
३०	चैतुखेरा	पुसपेंदर सिंग
३१	सिसौना	संजीत सिंग
३२	घुसरा	राजपूत सिंग राना
३३	भल्याबार	कापूर सिंग
	ओडीसा	
३४	बाडबिल	भूबननंदा पिंगुआ
३५	बंडापाडा	खितिश चंदा दास
३६	कुंतीया तुला	देबान कारजी
३७	खापरखाई	भूबान हेमब्राम
३८	बोडपुतका	बारजू मुरमू
३९	सारंग घर	दिनबंधू हेमब्राम
४०	उडबिलका	प्रकाश बलीयार
४१	तेन्लुलीपोसी	पीरथा सोरेन
४२	बाडापाडा	अंद्रिया भूयान
	महाराष्ट्र	
४३	उदापूर	विजय बी. मेश्राम
४४	वडाधा	सुधीर शिंगाडे
४५	सतलवाडा	राजकूमार मडावी
४६	चापोली	सहदेव सोनटक्के
४७	धनुरवाडी	
	रमेश एस.	

कर्नाटक

४८	गोसीकेरे	परम

S.NO.	VILLAGE	WORKER NAME
ज्योथी		
छत्तीसगड		
४९	देवडा	रामगोपाल चौहान
५०	गाधोला	सुफल खाटकर
५१	नागपूरा	विरेंद्र भारध्वास
५२	मधुबनकाला	उमेंद्र कुमार जंगडे
५३	केनेलोया	फेड्रीक भेंग्रा
५४	पांड्रा	सुकरा लोहारा
५५	बाटूवाटोली	विमल ब्रिजीया
गुजरात		
५६	रूपाली पाडा	रमेश चंद्र एन. कटारा
५७	विरपूर	योहानभाई एस. वसावा
५८	फतेगडी	अजयभाई एम. मुनिया
राज्यस्थान		
५९	वागेरी	रूबान मुनिया
६०	रासोडी	राकेश भुरीया
बिहार		
६१	काटेसर	दीना नाथ कुमार
६२	जय नगर	राज कूमार राम
६३	कौरिया	बंश नारायण प्रसाद
६४	नायका टोला	बिराजू कूमार
६५	बेलच्ची	राकेश कूमार
६६	ढोगरा	अमित कूमार
६७	जमालपूरा	जितेंद्र कूमार
६८	चरकरदाह	मंतोष कूमार
उत्तर प्रदेश		
६९	रानीबारी	धर्मेंद्र कूमार
७०	बाहूटी	दिलीप कूमार
७१	नागला	राजपाल सिंग
७२	घुरीपूर	कमलेश कूमार
७३	मेहमूदपूर	सुनील कूमार
७४	देहरा	सुनील कूमार
७५	नागालिया	सुनील कूमार
७६	अतासेनी	मोजिस मसिह
७७	जयरामपूर	कमलेश कूमार
७८	बलराव	संजीत कूमार
७९	समशेरपूर	बिरेंद्र कूमार
८०	रामपूर मथाना	मिंटू कूमार
८१	सांधा	संजय कूमार
८२	कमालपूर	संजीत कूमार
८३	रायहार	दिनेश श्रीवास्तवा
८४	देहरा माउ	विदयाधर तिवारी
८५	मटना पूर	धरमवीर
८६	वीरूपूरम	धरमवीर
८७	मदाफा	नंदा प्रसाद
मध्यप्रदेश		
८८	जशालपूर	राम कृष्ण कलाम
८९	सोनखार	देवेंद्र कूमार दोनाकर
९०	पिपरखुटा	प्रल्हाद सिंग
९१	नेवसा	रमेश कूमार मरावी
९२	गोरखपूर काला	सॅमसन मसीह
९३	विन्धीया	श्याम सुंदर कोल
९४	नौगांव	राजकूमार भटट
९५	धावन्हा	महेंन्द्र प्रताप सिंग
मणिपूर		
९६	उखोंगशांग एम. लईकाई	शोगनेचूंग कॉम. एम

S.NO.	VILLAGE	WORKER NAME
आसाम		
९७	कुडवनगारी	संजय बासूमोतराय
वेस्ट बंगाल		
९८	मलडांगा	जाकोब तुडू
९९	जयंतीका केओटालाईन	सुशील तेटे
१००	गावरावमोनी	तुना मर्डी
त्रिपूरा		
१०१	जतींन्द्र पारा	गानामोहन त्रिपूरा
१०२	जतींन्द्र न्यु कॉलनी	गानामोहन त्रिपूरा
१०३	बिनोटा कामी	रतन कूमार देबारमा
१०४	जुमला कामी	सुवाजोय देबारमा
१०५	सरोत चंद्र पारा	न्युटन रिंग
१०६	हेमसौखलपारा	मनमोहन रिंग
१०७	याकबारा	मनेरॉय रींग
१०८	चौखौखू	मनेरॉय रींग
१०९	दीनगाराई पारा	न्युटन रींग
११०	दानू राम पारा	रूपानजॉय रींग
१११	दारमीनी पारा	रूपानजॉय रींग
आंध्र प्रदेश		
११२	अवूलाना	अशोक वाय
११३	कन्यागूडा	जयराम एम
११४	बोलोवालासा	गंगाराव टी.बी
११५	मंडा	मि. ईलाराव
११६	पथापेडागुडा	मि. के. वेंकटराव
११७	मदयाकाला	मि. एस. भीमाराजू
११८	येरामानूगूडा	मि. जे. मोहनराव
११९	पेडाकेदारी	मि. जे. मोहनराव
१२०	वेरलामामीदी	वरूना कोरा
१२१	थमाराविधी	मि.के. पारासूरम
१२२	गोईगुंठा	मि. के. वरून
१२३	बारसिंगमेटा	मि. एस. चांतीबाबू
तेलंगणा		
१२४	उप्परूनटाला, बी. के	रेव्ह. थिरूपथै के

भारतातील २९ राज्यांतील ३९५७ पूर्णवेळ सेवकांकडून नाताळ व नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

कृतज्ञ असा

– रेव्ह. इम्यॅन्युएल ग्यानराज, डायरेक्टर– प्रेअर नेटवर्क

ख्रिस्ताची शांती तुमच्या अंतःकरणात राज्य करो, तिच्याकरिता तुम्हाला एक शरीर असे पाचारण्यात आले आहे, आणि तुम्ही कृतज्ञ असा. (कलस्सै.३:१५) आपण जे चांगले प्राप्त केले आहे ते आपण विसरणे चांगले नाही, आपण हे देखील शिकलो की इतरांनी केलेले बरे जे विसरतात ते जगु शकत नाहीत. हे माझ्या जिवा, परमेश्वराचा धन्यवाद कर, हे माझ्या सर्व अंतर्यामा, त्याच्या पवित्र नावाचा धन्यवाद कर, हे माझ्या जिवा परमेश्वराचा धन्यवाद कर,

त्याचे सर्व उपकार विसरू नको. (स्तोत्र. १०३: १-२) जेव्हा आपण जगाचे कार्य पाहतो की जे आपल्याला चांगूलपणा न सोडण्याचा आग्रह धरते तेव्हा आपण आश्चर्याने भरल्या जातो. प्रेषित २४ व्या अध्यायामध्ये चौकशी सुरू होते. येथे प्रेषित पौलाला फेलिक्स समोर पौलावर दोषारोप ठेऊ लागतो. प्रेषित २४:२-३ दुसऱ्या व तिसऱ्या वचना मध्ये तिर्तुल्ल ने वापरलेले हांजीहांजी चे शब्द आपल्याला पहायला मिळतात. तो काय म्हणतो?

''आम्ही तुमच्या अधिपत्या खाली शांतीचा मोठा काळ उपभोगला आणि तुमच्या दुरदृष्टीने देशात नवनिर्मिती आणली. प्रत्येक ठिकाणी आणि प्रत्येक मार्गाने अत्यंत उत्कृष्ट फेलिक्स, आम्ही हे कृतज्ञेने कबूल करतो.'' हे शब्द यहुदी पुढाऱ्यांच्या वतीने बोलण्यात आले जे रोमी नियमांचा आदर करत नव्हते व त्यांना ते नियम आवडत नव्हते.

हे कृतज्ञतेचे शब्द खरे नव्हते परंतू, हांजीहांजी करणारे होते. या ठिकाणी कृतज्ञता म्हणजे फसवणूक. सदयस्थिती त्यांच्या बाजूने फिरण्यासाठी ही

योजना खेळली गेली, मग अंतःकरणापासूनची कृतज्ञता कशी असेल?

जे कृतज्ञ असतात त्यांची कृत्ये काय असतील ?

१. कृतज्ञते मध्ये कर्जदारापासून देवाकडे

जेव्हा देवाने सर्व शत्रूंपासून विसावा दिला, तेव्हा दावीद देवाला कृतज्ञ होता. (२ शमुवेल २:७) प्रथमतः त्याने त्याचे राज्य बलशाली केले आणि त्यानंतर त्याने राजवाडा बांधला. परंतू त्याचे अंतःकरण व्यथित होते. ते काय होते? वचन २ म्हणते, तो नाथान संदेष्टयाला म्हणाला, ''मी इथे गंधसरूच्या घरात राहत आहे, पण देवाचा कोश कनाथीच्या आत राहत आहे.'' त्याने त्याची इच्छा व्यक्त केली,की देवाचा कोश ज्याने त्याला राजा बनवले तो एका उत्तम ठिकाणी असावा. मी त्याचे आभार कसे मानू ज्याने मला महान उंचीपर्यंत उचलले, ज्याने मला धुळीतून उचलले आणि मी जो मेंढरे राखायचो त्या मला त्याने इस्त्राएलावर राजा असे बनवले. जेव्हा तो तंबूमध्ये आहे तेव्हा मी राजवाडया मध्ये कसा राहू शकतो? त्याच्यासाठी एक मंदिर नाही तर एक राजवाडा बांधायला हवा. अशा पध्दतीने दावीद देवाविषयीची आपली कृतज्ञता दाखवू इच्छित होता. पूढे देवाचा संदेष्टा त्याला म्हणाला, तुझ्या मनात जे काही असेल ते कर आणि त्याने देवाची योजना त्याला प्रकट केली की तो दावीदाचे घर बांधेल

(२ शमुवेल ७) जेव्हा दावीदाला हे जाणवले की देव त्याला मंदिर बांधू देत नाही तेव्हा तो त्याची कृतज्ञता स्तोत्र. १३२ वचन १ ते ६ मध्ये व्यक्त करतो. त्याचप्रमाणे, आपण १इतिहास. २९:३ मध्ये देखील आपण पाहतो, देवाचे मंदिर बांधण्यासाठी दावीदाने सर्व काही केले. १ इतिहास २९:३ मध्ये तो म्हणू लागतो, मी देवाच्या मंदिरास खूप काही दिले आहे. ही देवाविषयीची कृतज्ञता आणि कष्ट आहेत की जे आभारपूर्वकरीत्या घेतले जातात. हे कष्ट आहेत जे त्याच्या संपूर्ण जीवन काळामध्ये घेण्यात आले.

२. मैत्रीसाठी कृतज्ञता

आपण आणखी एका परिस्थिती मध्ये दावीदाची कृतज्ञता पाहतो. शौल आणि योनाथानाच्या मृत्युनंतर दावीदाला राजा म्हणून अभिषेक करण्यात आला, गोलीयाथाला मारून दावीदाने शौलाला विजय प्राप्त करून दिला. परंतू शौल दावीदाच्या पाठीमागे लागला व तो त्याला मारू इच्छित होता. परंतू दावीद त्याला शत्रू म्हणून समजत नव्हता. त्याची इच्छा नव्हती की शौलाच्या मृत्यूनंतर त्याच्या पीढीला मारून टाकावे. उलट त्याने अशा कोणाएकाचा शोध घेतला ज्याला आपला मित्र योनाथान याच्या मदतीची गरज आहे. तो नातेसंबंध आणि करार विसरला नाही जो त्याने योनाथान बरोबर केला होता. तो त्याच्या मैत्री करता पून्हा देऊ इच्छित होता.

२ शमुवेल पूर्ण अध्याय ९ त्याच्या कृतज्ञतेविषयी प्रकट करते. लक्षात ठेवा जेव्हा योनाथानाचा मुलगा मफीबोशेथ ज्याचा पाय अपंग होता त्याला दावीदासमोर आणले तेव्हा दावीदाला काय वाटले ते तो ७ व्या वचनात म्हणतो, भिऊ नको, तुझा बाप योनाथान हयाच्याकरिता मी तुजवर अवश्य दया करीन. तुझा बाप शौल हयाची सर्व जमीन तुला परत देईन, आणि तू नित्य माझ्या पंक्तीस भोजन करावे. अशा प्रकारे त्याने त्याची कृतज्ञता व्यक्त केली.

३.आपण कृतज्ञ राहू शकतो का?

आपण आपल्या प्रभूंच्या प्रभू सोबत कृतज्ञ राहू शकतो का? त्याने स्वतःचा पूत्र अर्पण म्हणून दिला. प्रभू येशू ख्रिस्ताने आमची पापे त्याच्यावर घेतली. त्याने वधस्तंभ वाहिला आणि गुलगुथा वर चढला. त्याने त्याचे रक्त सांडले आणि अर्पण म्हणून त्याचे जीवन दिले. त्याच्या बद्दल आपण कृतज्ञ राहू शकतो का? देवांचा देव स्वर्गातून खाली आला आणि पृथ्वीवर जन्मला. आपण त्याच्यावर प्रेम करून त्याच्या महान बहुमुल्य प्रेमासाठी त्याचे आभार मानू शकतो का? मेंढपाळ आले आणि त्यांनी उपासना केली, आणि ज्ञानी लोकांनी देखील तसेच केले. त्याची उपासना करण्यासाठी आपण आपले अंतःकरण उघडू शकतो का? आपली जीभ कृतज्ञतेने भरो. आपल्या जीवनातील सर्वोत्तम अर्पण म्हणून देऊ या. आपण आपले जीवन कृतज्ञता म्हणून देऊ या. देवाने जसे दावीदाला आशिर्वादित केले तसे तो आपल्याला आशिर्वादित करो.

क्षेत्रीय वार्ता

स्तुती आणि प्रार्थना

ते संकटसमयी परमेश्वराचा धावा करतात
आणि तो त्यांस क्लेशांतून मुक्त करतो.
(स्तोत्र.१०७:१९)

१.जम्मु कश्मिरः.....(भक्ती गट पहिल्यांदा नाताळ साजरा करत आहेत)
१८ लोकांनी येशू मध्ये त्यांच्या नवीन विश्वासाची कबूली दिली. नवीन जागेत सांगण्यात आलेले देवाचे वचन १० लोक ज्यांचा नव्याने जन्म झाला आहे. त्यांच्यासाठी लाभदायक झाले. सेवक राकेश मसीह आणि सत्या यांना संतती वरदान प्राप्त झाल्या बद्दल परमेश्वराची स्तुती असो. कथुआ आणि राजौरी जिल्हयांमध्ये क्षेत्र उघडण्यासाठी आम्ही कष्ट घेत आहोत. जसवान गावामध्ये सेवाकार्या विरोधात काम करणाऱ्या लोकांनी पश्चात्ताप करावा, लाली आणि गंडाला क्षेत्रांमध्ये घेण्यात आलेल्या विश्वासाच्या कबुलीच्या सभा प्रार्थना करा.

२.हिमाचल प्रदेशः
बरोत आणि जगोती क्षेत्रांमध्ये १२ कुटूंब विश्वासणाऱ्यांच्या सहभागिते मध्ये सामील झाली. गुडवल सहभागिते मध्ये लोकं सेवाकार्य करण्यासाठी उत्सुक असल्याबद्दल परमेश्वराची स्तुती असो. सेवक मनोज आणि विरेंन्द्र खोखर यांच्या कुटूंबांना संतती वरदान दिल्याबद्दल परमेश्वराची स्तुती असो.३० लोक विश्वासाच्या कबुलीच्या सभेसाठी तयार होत आहेत बनग्रान आणि राजाका बाघ क्षेत्रांमध्ये चर्चच्या बांधकामासाठी जमीन खरेदी करायची आहे. सेवक मनीश यांची मुलगी त्वचा विकाराने त्रस्त आहे. प्रार्थना करा.

३.पंजाबः
सुनीता ज्या ५ वर्ष दुष्ट आत्म्याच्या बंधनामध्ये होत्या त्यांची येशूच्या नावात सुटका झाली. क्षेत्र सर्वेक्षणा द्वारे २५ नवीन गावं सेवाकार्यासाठी ओळखण्यात आली. ८५ लोकांनी क्षेत्रामध्ये त्यांच्या नवीन विश्वासाची कबूली दिल्याबद्दल परमेश्वराची स्तुती असो. ३० गावांमध्ये घेण्यात आलेल्या नाईट प्रेअर साठी पाठपुराव्याचे सेवाकार्य घेण्यात आले, जे विश्वासणारे दावीदा, अहराना आणि बुलोवाल येथे पंजाबी मेळयामध्ये उपस्थित होते त्यांनी जीवात्म्यांच्या कापणी मध्ये सहभाग घ्यावा. सत्यशोधकाच्या सभेद्वारे ज्या ९५ नवीन विश्वासणाऱ्यांना प्रभूची ओळख झाली ते देवाच्या वचनामध्ये बलशाली व्हावेत. प्रार्थना करा.

४. उत्तराखंड

प्रीत नगर भक्ती गटामधुन विष्णू थापा आणि बलराम हे सेवाकार्य करण्यासाठी स्वंयसेवक म्हणून पूढे आले आहेत. रूरकी तालुक्यामध्ये लाबौली क्षेत्र येथे क्षेत्र सेवाकार्य सुरू करण्यात आले. १८ लोकांनी त्यांच्या नवीन विश्वासाची ख्रिस्ता मध्ये कबूली दिली. २७ लोक जे सत्यशोधक सभेमध्ये उपस्थित होते त्यांनी येशूचा आपला तारणारा म्हणून स्विकार केला आहे.
थारू लोक गटामध्ये पोहचण्यासाठी २० तरूणांची गरज आहे, तुकरी विचवा, नकुलीया आणि बनबासा येथे सुवार्ता कार्य सुरू करण्यात आले.चिंतीमाजरा आणि माहुवत या गावांमध्ये देवाचे मंदिर उभारण्यात यावे म्हणून प्रार्थना करा.

५. हरियाणाः

ज्यांनी देवाचे वचन ऐकले अशा ३०० लोकांमधून ७५ लोकांनी पश्चात्ताप केला. ते आनंदाने पवित्रशास्त्र अभ्यास गटात उपस्थित राहतात. दिघोत येथे नवीन पवित्रशास्त्र अभ्यास गट सुरू करण्यात आला आहे. फरिदाबाद जिल्हा येथे १५ गावे सेवाकार्यासाठी ओळखण्यात आली. बबीयाल, कतखाद आणि सोंध येथे सुरू असलेल्या नाईट मिटिंग मध्ये नवीन जीवात्मे यावेत. असवरपूर येथे भक्ती गट सूरू करण्यासाठी कष्ट घेण्यात आले, रितू आणि स्नेहा या कर्करोगाने ग्रस्त आहेत. प्रार्थना करा.

६. दिल्लीः

कंजनकुज येथे सुरू करण्यात आलेल्या पवित्रशास्त्र अभ्यास गटात उपस्थित राहणाऱ्या लोकांची संख्या वाढली आहे. मधनपूर खदार येथे ३ नवीन कुटूंब भक्ती गटामध्ये सहभागी झाले आहेत. राम कुमार जे रस्ते अपघातामधून बचावले ते प्रभूची स्तुती करत आहेत.
जे लोक दिल्ली मध्ये आणि आजुबाजुच्या गावांमध्ये वास्तव्यास आहेत त्यांना आरोग्यदायक हवा प्राप्त व्हावी, प्रियंका कॅम्प मध्ये जे २ कुटूंबं विश्वासापासून मागे हटले आहेत त्यांनी सहभागिते मध्ये यावे, २७ कुटूंबं जे विश्वासणाऱ्यांची कौटूंबिक सहभागिता यामध्ये उपस्थित होते त्यांनी नवीन कुटूंबांना परमेश्वराकडे आणावे म्हणून प्रार्थना करा.

७. राज्यस्थानः

खादीया गावात लहानगा एस हा २० दिवस बेशुध्द होता, तो येशुच्या नावात चालू लागला. जेकदा आणि नेनबारा क्षेत्रांमधील चर्चचे बांधकाम येशूच्या नावामध्ये उभे राहत आहे. १० लोकांनी येशू मध्ये त्यांच्या नवीन विश्वासाची कबुली दिली. पटीया येथे एक नवीन भक्ती गट सुरू करण्यात आला. विकोलीया येथे पेरण्यात आलेल्या देवाच्या वचनाने नवीन जीवात्मे दयावेत. सारादीत, चारपोटा बाडा, वागेरी आणि पालीयाखेडा क्षेत्रांमध्ये चर्चच्या बांधकामांसाठी आम्हाला जमीन खरेदी करणे गरजेचे आहे. डूंगरपूर, राजसमंड आणि सिरोही जिल्हयांमध्ये सुरू असलेले क्षेत्र सर्वेक्षण प्रार्थना करा.

८. उत्तर प्रदेश, लखनऊ

३५ गावांमध्ये सत्यशोधकाची सभा घेण्यात आली, ५६ कुटूंब विश्वासणाऱ्यांच्या सहभागिते मध्ये सामील झाली २५० महिला ज्या शिवणकामाच्या वर्गात सहभागी झाल्या आणि त्यांना लाभ प्राप्त झाला. त्याबद्दल परमेश्वराची स्तुती असो. ११० गावं क्षेत्र सर्वेक्षणा द्वारे सेवाकार्यासाठी ओळखण्यात आली. औरिया येथील सेवक बच्चेलाल यांचा मुलगा आर्याचंद हा मानसिकरित्या आजारी आहे. भोजपूरी प्रांत येथे ६७२ लोक विश्वासाच्या कबुलीच्या सभेसाठी तयार होत आहेत. ४ भक्ती गट जे विश्वासणाऱ्यांनी भरलेले आहेत त्यांच्याकरता चर्चच्या बांधकामासाठी जमीन खरेदी करायची आहे. प्रार्थना करा.

९. उत्तर प्रदेश-भोजपुरीः

८ नवीन सेवक ज्यांनी त्यांचे प्रशिक्षण पूर्ण केले आणि क्षेत्र उघडली त्यांच्या बद्दल परमेश्वराची स्तुती असो. शिव देवी ज्यांना परमेश्वराद्वारे आरोग्य प्राप्त झाले त्यांच्या साक्षी द्वारे कुरियाकानी गावात सुवार्ता सांगण्यात आली. परमेश्वराने गंगादेवी यांच्या परिवाराला समरसेपूर क्षेत्र येथे शांतीचे पात्र म्हणून ठेवले आहे. परमेश्वराची स्तुती असो. सेवक इशाक मसीह डेंग्यू मुळे अशक्त झाले आहेत, पूर्ण आरोग्यासाठी प्रार्थना करा. रेहरा आणि बलराव येथील भक्ती गटांच्या चर्चच्या बांधकामासाठी जमीन खरेदी करायची आहे. अजय ज्याला पक्षघात झाला आहे त्याला येशूच्या स्पर्शाची आवश्यकता आहे, प्रार्थना करा.

१०. बिहारः

१५ तरूणांनी सुवार्ता कार्यासाठी त्यांचे समर्पण केले आहे. बेलाची, धोधारा, नयाकतोला आणि जमालपूर येथे देवाचे मंदिर उभारण्यात आले. बारा खारौनी क्षेत्र येथे चर्चच्या बांधकामासाठी परमेश्वराने आम्हाला कृपायुक्तरीत्या जमीन दिली आहे. परमेश्वराची स्तुती असो. सेवक रामबाली यांची पत्नी ॲपेन्डीक्सने त्रस्त आहे. ९१ लोक ज्यांनी येशू मध्ये त्यांच्या नवीन विश्वासाची कबूली दिली. त्यांच्या आत्मिक वाढी साठी ५२१ लोक जे विश्वासाच्या कबुलीच्या सभेच्या पूर्वतयारीच्या वर्गाला उपस्थित राहणार आहेत, प्रार्थना करा.

११. झारखंडः

खोरथा भाषिक गटामध्ये सुवार्ता कार्य सुरू झाले. १७ लोकांनी त्यांच्या नवीन विश्वासाची कबुली दिली, कसमर गावात चर्चच्या बांधकामासाठी जमीन तयार आहे. संतोष राम जे चायछन्नी गावामध्ये सेवाकार्याला विरोध करत होते ते आता सुवार्ता द्वारे नवीन उत्पत्ती झाले आहेत. संजय ओरॅन कुटूंब जे नव्याने चितकोनी पवित्रशास्त्र अभ्यास गटामध्ये सहभागी झाले आहेत त्यांची देवाच्या प्रीतीमध्ये वाढ व्हावी. सेवक लालू ओरॅन यांच्या मणक्याला रस्ते अपघातामुळे दुखापत झाली आहे, त्यांना येशूच्या स्पर्शाची आवश्यकता आहे. नवीन विश्वासी बिरसा गुरिया जे कामदा गावामध्ये सुवार्ता सांगतात त्यांनी अनेकांना नीतिमत्वाकडे आणावे यासाठी प्रार्थना करा. क्षेत्र सेवक लालू ओरॅन यांनी देवाच्या गौरवात प्रवेश केला असताना परमेश्वराने त्यांची पत्नी प्रिसिल्ला बरला आणि दोन वर्षांची मुलगी ॲलीन यांचे सांत्वन करावे.

१२. पश्चिम बंगाल (दार्जिलिंग):

परमेश्वराने करूणा टिग्गा यांना टि. बी च्या आजारापासून पूर्ण सुटका दिली आहे. भुवानगुरी आणि कमलाबारी येथे विश्वासणाऱ्यांची संख्या वाढत आहे. प्रभूची स्तुती असो. सुनील ओरॅन जे २ वर्षा पासुन पक्षाघातग्रस्त झाले होते ते आता येशुच्या नावामध्ये चालू लागले आहेत. तायपू क्षेत्र येथे पाहण्यात आलेले अंधकाराचे कार्य परमेश्वराने दुर करावे. हिमालया प्रेअर कॅम्पचे पाठपुराव्याचे कार्य चुमता गावकरी जे दारूच्या व्यसनात आहेत त्यांच्या तारणासाठी पूर्बीसातबील गावकऱ्यांनी सुवार्तेवर विश्वास ठेवावा यासाठी प्रार्थना करा.

१३. पश्चिम बंगाल (एथलबारी):

६१० गावे क्षेत्र सर्वेक्षणा द्वारे नव्याने सुवार्ता कार्यासाठी ओळखण्यात आली. खोवारलाईन गावातील जमुना ओरॅन हे प्रार्थने द्वारे टयुबरक्लोसिस मधुन बरे झाले आणि आता ते त्यांची साक्ष सांगत आहेत. एस येथील सिब्ती बारी यांचे कुटूंब परमेश्वराची सेवा करण्यासाठी पुढे आले आहे. प्रभूची स्तुती असो. सेवक बिजय तुरी यांना विरोधाच्या मध्ये देवाचे साहाय्य प्राप्त व्हावे. बिष्णू, जस्विना यांचे कुटूंब जे नव्याने सलधुरा विश्वासणाऱ्यांच्या सहभागिते मध्ये सामील झाले आहेत, ते देवाच्या वचनामध्ये बलशाली व्हावेत. सेवक निरेन हजदा जे मुरूघुटू गावात पवित्रशास्त्र अभ्यास गट सुरू करण्यासाठी काम करत आहेत, प्रार्थना करा.

१४. पश्चिम बंगाल (कलकत्ता)

खाकुरडा क्षेत्र येथील कृष्णा मुंडा यांचा विषारी सापाच्या दंशापासुन बचाव झाला आणि ते त्यांची साक्ष सांगत आहेत. तरूण बिनोद सोरेन जो रेरीपूर भक्ती गट येथे स्वंयसेवेरीत्या काम करत होता त्याने पूर्णवेळ सेवाकार्यासाठी स्वतःचे समर्पण केले आहे. करी दास आणि बिष्णू मुरमू यांची दुष्ट आत्म्याच्या बंधनापासून सुटका झाली. एस, गावकऱ्यांनी येशूची प्रीती जाणावी. लिली सोरेन यांचा मानसिक आजार येशूच्या नावात बरा व्हावा. हतपारा आणि कोपाथाट क्षेत्र येथे विश्वासणाऱ्यांची संख्या वाढावी, प्रार्थना करा.

१५. आसाम

बोडो आणि राबा लोकगटांमध्ये ४ पवित्रशास्त्र अभ्यास गट सुरू करण्यात आले. सत्यशोधक सभेद्वारे १२८ गावांमध्ये देवाचे वचन सांगण्यात आले. लाओरीपारा येथे ९ लोकांनी पापांची क्षमा प्राप्त केली. मिसिंग लोकगटामध्ये ३१ लोक विश्वासाच्या कबूलीच्या सभेसाठी तयार होत आहेत. राम कुमार चेत्री हे विश्वासामुळे विरोधाचा सामना करत आहेत. जलपायगुरी येथे पाहण्यात आलेला विरोध परमेश्वराने दुर करावा, प्रार्थना करा.

१६. सिक्कीमः

भालूयांग प्रांतातील सुब्बा लोकगट सुवार्ता ऐकण्यासाठी उत्सुक आहेत. ४ लोकांनी ख्रिस्तामध्ये त्यांच्या नवीन विश्वासाची कबूली दिली. ताडोंग गावातून सोनम तमांग यांचे कुटूंब सुवार्ता सांगण्यासाठी पुढे आहे, प्रभुची स्तुती असो. हाथीदुँगा गावातील विश्वासणाऱ्यांची आत्मिक वाढ टिकाराम शर्मा यांचा अविश्वास येशूच्या नावात बदली व्हावा. जे विश्वासणारे जोथाँग विशेष सभे मध्ये उपस्थित होते, त्यांनी जीवात्म्यांच्या कापणीमध्ये सहभागी व्हावे, प्रार्थना करा.

१७. मनीपूरः

केईबूल गावामध्ये ३ कुटूंब विश्वासणाऱ्यांच्या सहभागितेमध्ये सामील झाली आहेत. चिंगखुनाओ, टेकचाम, आणि लैमाराम येथे घेण्यात आलेली चिल्ड्रेन्स मिनिस्ट्री ३७२ मुलांना लाभदायक ठरली. सत्यशोधक सभेला उपस्थित राहिलेल्या २५२६ लोकांपैकी ३५८ लोक सुवार्ता ऐकण्यासाठी उत्सुक आहेत. लामजाओ गावातील विश्वासणाऱ्यांना एकत्र परमेश्वराची उपासना करण्यासाठी जमीनीची आवश्यकता आहे. सलाम क्षेत्र येथील सेवक टी. रमेश सिंग हे विरोधाचा सामना करत आहेत. विरोधामध्ये देवाने कृपा पुरवावी यासाठी प्रार्थना करा. २४५ लोक जे विश्वासाच्या कबुलीच्या सभेसाठी तयार होत आहेत, प्रार्थना करा.

१८. त्रिपूराः

अशोक कॉलनी येथे देवाचे मंदिर उभारण्यात आले. २९ लोकांनी ख्रिस्तामध्ये त्यांच्या नवीन विश्वासाची कबूली दिली. अकंग्मा पारा, विश्ववाणी कामी, धनुराम पारा आणि गोंदारी येथे विशेष मेळे भरविण्यात आले. आम्हाला नवीन संपर्क प्राप्त झाले. परमेश्वराची स्तुती असो. हरूंगपारा आणि क्वचाम कामी येथील विश्वासणाऱ्यांची संख्या वाढावी, उऐमचारापारा येथे उघडण्यात आलेल्या चर्च द्वारे आसपासच्या गावांना सुवार्ता सांगण्यात यावी. ११ क्षेत्रांमध्ये चर्चचे बांधकाम पूर्ण व्हावे. प्रार्थना करा.

१९. ओडीसा – कंधमालः

३ नवीन कुटूंब सुद्र क्षेत्र मंडळी मध्ये सहभागी झाली. रामनाथ कुटूंब ज्यांना १० वर्षांनंतर संतती वरदान प्राप्त झाले आहे ते येशूची स्तुती करत आहेत. ३ गावांमध्ये पवित्र शास्त्र अभ्यास गट सुरू करण्यात आला. कंदरमुंडा येथील देवाचे मंदिर बलशाली व्हावे, लालेरीकिया येथे जे लोक सेवाकार्याला विरोध करतात त्यांची परमेश्वराने भेट घ्यावी, सेवक बटागुडा ज्यांनी बिभिसन येथे नवे क्षेत्र उघडले आहे त्यांच्यासाठी परमेश्वराने सेवकार्याच्या सीमा वाढवाव्यात प्रार्थना करा.

२१. ओडीसा- संबलपूरीः

१० तरूणांनी पूर्णवेळ सेवाकार्यासाठी स्वतःचे समर्पण केले. कार्लामुहान गाव जेथे संबलपूरी लोक राहतात तेथे देवाचे मंदिर समर्पित करण्यात आले. ६ लोकांनी येशू मध्ये त्यांच्या नवीन विश्वासाची कबुली दिली, प्रभूची स्तुती असो. १२ लोक नव्याने विश्वासणाऱ्यांच्या सहभागिते मध्ये उपस्थित राहतात, ते देवाच्या वचनामध्ये बलशाली व्हावेत, बालंगीर वेब सेंटरला संगणकाची आवश्यकता आहे. पश्चिम ओडीसातील ४ क्षेत्र जेथे विश्वासणारे वाढत आहेत तेथे चर्चच्या बांधकामासाठी जमीनीची आवश्यकता आहे, प्रार्थना करा.

२२. ओडीसा -परालाखेमुंडी प्रांतः

आम्हाला सुवार्ता चित्रपटाद्वारे ४ गावांमध्ये नवीन संपर्क प्राप्त झाले आहेत. खजुरीसाही गावकऱ्यांना सुरक्षित पिण्याचे पाणी प्राप्त झाले आहे. १४ लोकांनी येशू मध्ये त्यांच्या नवीन विश्वासाची कबूली दिली. २८ नवीन गावांमध्ये सत्यशोधक सभा घेण्यासाठी परमेश्वराने सेवकांचे मार्गदर्शन करावे. सुवार्ता चित्रपटाद्वारे १२ गावांपर्यंत पोहचण्यासाठी कष्ट घेण्यात आले. सबालादा, लुम्बदासिंग आणि बिजीपूर क्षेत्र येथील चर्चच्या बांधकामासाठी प्रार्थना करा.

ओडीसा- हो, संताली प्रांतः

पातुलीदिही आणि अशनबानी क्षेत्रांतील विश्वासणारे जे सेवाकार्या मध्ये उत्सुक आहेत त्यांच्या बद्दल परमेश्वराची स्तुती असो, बोदपुतका येथील रात्र सभेनंतर आम्हाला सेवाकार्यासाठी नवीन संपर्क प्राप्त झाले. नवीन विश्वासी सुबोध हेमब्रॉम यांच्याद्वारे बरूदीही गावात सुवार्ता पसरविण्यात आली, प्रभुची स्तुती असो. बुधूराम मुंडा यांचे कुटूंब जे नव्याने बतासाही भक्तीगटामध्ये उपस्थित राहतात, त्यांची विश्वासामध्ये वाढ व्हावी. सेवक त्रिलोकन डांगा यांनी त्यांच्या आईला गमावल्याने त्यांचे व त्यांच्या कुटूंबियांचे सांत्वन व्हावे. बसंतपूरा गावकरी ज्यांनी मुसळधार पावसामुळे व पुरामुळे त्यांच्या वस्तू गमावल्या आहेत, प्रार्थना करा.

२३. छत्तीसगडः

गोूला गावामध्ये देवाचे मंदिर उभारण्यात आले. मुलमुला भक्ती गटाद्वारे घेण्यात आलेले बोअरवेल मुलमुला गावकऱ्यांसाठी समर्पित करण्यात आले. २८ लोकांनी येशूमध्ये त्यांच्या नवीन विश्वासाची कबुली दिली. प्रभूची स्तुती असो.बुधेलाल जे ड्रग्सच्या व्यसनाधीन आहेत त्यांनी पश्चात्ताप करावा विसंभर ज्यांना तोंडाचा कर्करोग आहे तो बरा व्हावा, जे लोक छत्तीसगडी विश्वासणाऱ्यांच्या मेळयाला उपस्थित होते त्यांनी जीवात्म्यांची कापणी करावी, प्रार्थना करा.

२४. मध्य प्रदेशः

सुषमा ज्या ॲनेमिया मुळे ४ महिने अशक्त होत्या त्यांना येशुच्या नावामध्ये सामर्थ्य प्राप्त झाले. येशूने विश्वासी राजा यांच्या जीवनाचे संरक्षण केले ज्यांचे पाय विषारी सापाने घेरले होते. रामभरोस यांच्या साक्षीद्वारे त्यांच्या संपूर्ण कुटूंबाचे तारण झाले. रवी सिंग ज्यांना ऐकायला कठीण जाते त्यांना परमेश्वराने आरोग्य दयावे, अनारकली ज्या २२ वर्षांपासुन मानसिकरीत्या आजारी आहेत त्यांच्यावर परमेश्वराने कृपा करावी. रेनू भाईदी यांचे कुटूंब निराशेमध्ये आहे कारण तीन मुलं जन्मली आणि कोणीही जिवंत राहले नाही, प्रार्थना करा.

२५. गुजरात - दाहोडः

४५ लोकांनी येशू मध्ये त्यांच्या नवीन विश्वासाची कबूली दिली. ९०० लोकांना सुवार्ता घोषित करण्यात आली. ५८ लोकांना पश्चात्तापाचे महत्व समजले आणि ते विश्वासणाऱ्यांच्या सहभागिते मध्ये सामील झाले. पटीया आणि नानी चारोली क्षेत्रातील विश्वासणाऱ्यांची संख्या वाढत आहे, प्रभुची स्तुती असो. १५२ ठिकाणी घेण्यात आलेल्या सत्यशोधक सभांनी नवीन

जीवात्मे दयावेत, वालाभाई गरासिया यांचे कुटूंब ज्यांनी हदमाद येथे चर्चच्या बांधकामासाठी जमीन देणगी म्हणून दिली त्यांना परमेश्वराने आशिर्वाद दयावा. क्षेत्र सर्वेक्षणाद्वारे ३० गावं सेवाकार्यासाठी ओळखण्यात आली, प्रार्थना करा. बोरसाना क्षेत्र येथे घेण्यात आलेला दबोरा कॅम्प ११६ लोकांकरिता लाभदायक ठरला. १२ तरूण पूर्णवेळ सेवाकार्य करण्यासाठी स्वतःचे समर्पण करण्यासाठी पुढे आले. मोझारा आणि नाना सुकामा येथे पवित्रशास्त्र अभ्यास गट सुरू करण्यात आला. जुम्मावाडी आणि कांदी अम्बा क्षेत्र येथे चर्चच्या बांधकामाचे कार्य सुरू झाले. सोरापाडा येथिल विश्वासणाऱ्यांची संख्या वाढावी, चिमीपटाल आणि वडगम येथे घेण्यात येणाऱ्या सुवार्ता सभेने नवीन जीवात्मे दयावेत. सि. मोगरा बेन ज्या त्वचा विकारामुळे नैराश्या मध्ये आहेत त्या येशुच्या नावात बऱ्या व्हाव्यात, प्रार्थना करा.

२७. गुजरात - नर्मदा जिल्हा:

बोरसाना सेवाक्षेत्रात दबोरा कॅम्प घेण्यात आला. ११६ लोकांची उपस्थिती त्या ठिकाणी होती. आणि १२ तरूण पूर्णवेळ सेवेसाठी समोर आले आहेत. मोझारा आणि नाना सुकामा या ठिकाणी पवित्र शास्त्र अध्ययन सूरू करण्यात आले आहे. जुम्मावाडी आणि कांदी अंबा सेवाक्षेत्रात प्रार्थना मंदिराचे बांधकाम सूरू झाले. प्रभूची स्तुती असो.

सोरापाडा मध्ये विश्वासणाऱ्यांची संख्या वाढत आहे. चिमीपातळ आणि वेडगम या ठिकाणी सुवार्ता सभा घेण्यात आले. त्वचा रोगामुळे बहिण मोगरा खूप त्रस्त होती, परंतू प्रभू येशूने तिला पूर्णपणे आरोग्य दिले आहे. प्रभूची स्तुती असो.

२७. महाराष्ट्र:

११ लोकांनी त्यांच्या नवीन विश्वासाची कबुली दिली. लघडवल येथिल प्रशिक्षण केंद्रासाठी ज्या विश्वासणाऱ्यांनी संगणक, देणगी स्वरूपात दिला त्यांच्याबद्दल परमेश्वराची स्तुती असो. आंधळगाव येथे सुरू असलेल्या उपवास प्रार्थना लाभदायक ठरल्या. अंबरनाथ आणि अहमदनगर येथिल वेब सेंटर साठी सेवकांची गरज आहे, देऊळगाव येथील चर्चचे बांधकाम नियोजित वेळेत पूर्ण व्हावे, २८ लोक विश्वासाच्या कबुलीच्या सभेसाठी तयार होत आहेत. २०२० पर्यंत १० क्षेत्रांमध्ये चर्च बांधण्यासाठी आमची इच्छा परमेश्वराद्वारे पूर्ण व्हावी, प्रार्थना करा.

२८. तेलंगणा:

५० नवीन गाव सुवार्ता कार्यासाठी नव्याने ओळखण्यात आली, त्यापैकी १९ गावांमध्ये सेवक आहेत, नवीन सेवक आल्याने २३ पवित्रशास्त्र अभ्यास गट सुरू करण्यात आले. जंगाओम आणि गुज्जा येथे देवाच्या योजने नुसार चर्चचे बांधकाम करण्यात आले, परमेश्वराची स्तुती असो. नक्षर कुरनुल जिल्हयाच्या अंतर्गत गावांसाठी सेवकांची गरज आहे, आम्हाला मार्च २०२० पूर्वी ७ क्षेत्रांमध्ये चर्चचे बांधकाम पूर्ण करणे गरजेचे आहे, व्हिजन प्लॅन नुसार ४६५८ गावांना आम्हाला सुवार्ता सांगणे गरजेचे आहे.

२९. आंध्र प्रदेश -विझियानगरम्:

झिरीका वालसा क्षेत्र येथील रामु ज्यांचा विषारी सापाच्या चाव्यापासून बचाव झाला ते येशूची स्तुती करत आहेत. सुनकी क्षेत्र जेथे विश्वासणाऱ्यांची संख्या वाढत आहे, तेथे चर्चच्या बांधकामा साठी जमीन तयार आहे. क्षेत्र सर्वेक्षणाद्वारे १८ गावं सेवाकार्यासाठी ओळखण्यात आली, प्रभूची स्तुती असो. चप्पाबु चिंम्पेटा आणि निम्मालापाडू क्षेत्र सेवाकार्यासाठी सेवकांची गरज आहे, नंदा प्रांतातील सेवाकार्य विरोधाचा सामना करत आहेत. जियाम्मावालसा आणि

पद्मापूरम येथील सेवक वाढत असल्याने चर्चच्या बांधकामासाठी जमीन खरेदी करायची आहे, पंडीरीवालसा आणि अमीती या गावांद्वारे त्यांच्या शेजारील गावांमध्ये सुवार्ता प्रसार केल्या जावा, प्रार्थना करा.

३०. आंध्र प्रदेश- पश्चिम गोदावरीः

परमेश्वराने बंडाम्बवी क्षेत्र सहभागितेसाठी अल्लुरायाह यांच्या कुटूंबाला एकत्र केले आहे. परमेश्वराने रामबाबू डोरा यांच्या कुटूंबाला उसीरीजोन्नालू या गावातील सेवाकार्यासाठी तयार केले आहे. बापी राजू ज्या डेंग्यु मुळे मृत्युशय्येवर होते ते बरे झाले आहेत. त्या लोदीपालेम या गावात एक साक्षीदार बनल्या आहेत, प्रभूची स्तुती असो. उदाथपल्ली चर्च विश्वासणाऱ्यांनी सुवार्ता कार्यामध्ये उत्सुक असावे. बं डापल्ली गावकरी जे अंधकारामध्ये आहेत त्यांचे तारण व्हावे, चेरूवुगुडेम क्षेत्र येथील चर्चचे बांधकाम पूर्ण व्हावे, प्रार्थना करा.

३१. कर्नाटकः

हल्ली क्षेत्रातील लक्ष्मण यांनी दारू न पिण्याचे ठरवले आहे. २७ लोकं ज्यांनी येशू मध्ये नवीन जीवन प्राप्त केले आहे त्यांनी त्यांच्या नवीन विश्वासाची कबूली दिली आणि क्षेत्र मंडळयांमध्ये ते सहभागी झाले. १६४ सत्यशोधक सभा घेण्यात आल्या, १६५२ जीवात्म्यापर्यंत पोहचण्यात आले, प्रभूची स्तुती असो. उदेगोलम येथे सुरू असलेल्या सुवार्ता सभेमध्ये नवीन लोकांनी उपस्थित राहावे, १६० लोक विश्वासाच्या कबूलीच्या सभेच्या पूर्वतयारीच्या वर्गाला उपस्थित राहणार आहेत त्यांना ख्रिस्तामध्ये बल प्राप्त व्हावे, मोलाकेरा क्षेत्र येथील संजु कुमार यांनी पत्नी गमावल्याने त्यांचे व त्यांच्या तीन मुलांचे सांत्वन व्हावे, प्रार्थना करा.

****

डिसेंबर आणि जानेवारी महिन्यात मिळालेले विशेष दान वस्तू

देणगीदाराचे नाव	ठिकाण	देणगी	सेवकांचे नाव
१. सुनील रायराम	बुलढाना	२ पंखा	बंधु मार्क नवले
२. सुहासिनी गांभीर	नागपूर	१ पंखा	बंधु मार्क नवले
३. पद्मा अंजोरे	नागपूर	१ सायकल	बंधु नितीन रामटेके
४. निमा गोंदणे	नागपूर	१पूलपिट	बंधु नितीन रामटेके
५. संतोष काटकर	यवतमाळ	१ सायकल	बंधु बुधाजी गेडाम
६. प्रभा धोतेकर	दुर्गापूर	१ सायकल	बंधु धुर्योधन मडावी
७. कुमुदिनी खाडे	चंद्रपूर	१ पंखा	बंधु धुर्योधन मडावी
८. शरला हातकामकर	सोलापूर	१ सायकल	बंधु जुगल हारपाल
९. सरोजिनी पवार	पूणे	१ ढोलकी	बंधु शरद पवार
१०. स्मिता कोरे	पूणे	१ सायकल	बंधु प्रफुल्ल चाक्रे
११. कांबळे छाया	पूणे	१ पंखा	बंधु फिलिप वानखेडे
१२. निर्मला गावित	नाशिक	१ सायकल	बंधु आनंद वळवी
१३. एस. राठोड	बारामती	३ सायकल	बंधु फिलिप वानखेडे

कृपया प्रभु तुम्हाला हि सेवा करण्यासाठी मार्गदर्शन करित असेल तर, आपण आपल्या विभागातील सेवक/ प्रतिनिधी किंवा स्टेट ऑफिस अंबरनाथ येथे संपर्क करावा. ८००७३७७७३३

साक्षः परमेश्वर सर्व गरजा पूर्ण करतो.

मी सर्वप्रथम परमेश्वराला धन्यवाद देतो की, परमेश्वर खूप महान आहे. कारण की त्याने आमच्या जीवनामध्ये महान कृत्ये केली आहेत आणि ती ही की आम्ही गोजेगाव मंडळीतले सगळे लोक एक आमचे हया गावचे पहिले विश्वासणारे गायकवाड संजय यांचा घरी भरत होते. आणि सगळे विश्वासणारे प्रार्थनेला जमत होतो आम्हाला असे वाटत होते की, आम्हाला पण एक प्रार्थना मंदिर असावे, जेणेकरून सर्व विश्वासणारे एकत्र येतील आणि जिवंत देवाची भक्ती करतील पण आम्हाला विचार येत होता की हे कसं शक्य होणार परंतू आम्ही सगळे विश्वासणारे मिळून आम्ही प्रार्थना करत होतो की गोजेगाव सेवाक्षेत्रामध्ये एक प्रार्थना मंदिर बांधण्यात यावे. आणि परमेश्वराने आमची प्रार्थना ऐकली एके दिवशी आमच्या गोजेगाव सेवाक्षेत्रात आमचे अधिकारी आले होते, आणि आम्ही संध्याकाळी चे प्रार्थनेचे नियोजन केले, आणि आम्ही सर्व प्रार्थनेसाठी मैदानात बसलो आणि प्रार्थना खूप आशिर्वादित झाली. तेव्हा आमच्या अधिकाऱ्यांनी आम्हाला विचारले की हया गावामध्ये किती लोक विश्वासणारे आहेत? आणि आम्ही त्यांना सांगितले की दादा आम्हाला प्रार्थना मंदिराची गरज आहे, त्यांनी आम्हाला सांगितले की प्रार्थना करा आणि एका आठवडयात त्यांचा मला फोन आला की, गोजेगाव मध्ये प्रार्थना मंदिरासाठी जागा पहा आणि मी खूप आनंदित झालो. आणि आम्ही जागा पहायला सूरूवात केली, आम्हाला चांगली जागा मंदिरासाठी कोठे मिळत नव्हती. आम्हाला जागा भेटायला खूप उशीर लागला परंतू आमच्या प्रार्थना सतत सूरू होत्या. आणि आम्हाला एक जागा मिळाली आणि आम्ही ते आमच्या अधिकारी यांना बोलावून ती जागा दाखवली. तेव्हा ते म्हणाले ठीक आहे, आम्ही जागा पाहिली पण आमच्याकडे आणि आमच्या ऑफिसकडे पण पैसे नव्हते पण आमच्या प्रार्थना सतत सूरू होत्या. देवाने एक मार्ग उघडला अहमदनगर मध्ये आमचे बंधू प्रमोशनल कार्य करतात त्यांचे नाव बंधू. शरद पवार, त्यांना मी हया जागेबद्दल सांगितले तेव्हा त्यांनी मला एका विश्वासणाऱ्यांचे नाव सांगितले शालिनी शंकर पवार हया बुऱ्हाण अहमदनगर येथे राहतात देवाने त्यांच्या जीवनात कार्य केले आणि त्यांच्या हस्ते ही जागा आम्ही प्रार्थना मंदिरासाठी घेतली. जागा घेऊन झाली पण विचार आला की प्रार्थना मंदिराचे बांधकाम कसे करायचे? पण परमेश्वर महान आहे, देवाला सर्व शक्य आहे. परमेश्वराने मुंबईमधल्या एका परिवाराला निवडले आणि त्यांच्या हस्ते प्रार्थना मंदिराचे बांधकाम करून घेतले. परमेश्वराने आमच्या सर्व गरजा त्याच्या स्वर्गीय भांडारातून पूर्ण केले. प्रभूची स्तुती असो.

रेव्ह. विश्वास मोतेवार
गोजेगाव प्रार्थना मंदिर, नांदेड

२३ तरूण सहभागी झाले

२३ तरूण ज्यांनी राज्यस्थानच्या खेडयापाडया पर्यंत पोहचण्याचा दृष्टांत प्राप्त केला त्यांनी पूर्णवेळ सेवाकार्यासाठी स्वतःचे समर्पण केले आणि ५ नोव्हेंबर २०१९ रोजी ते प्रशिक्षणामध्ये सहभागी झाले. सेवानिया क्षेत्र येथे घेण्यात येणारे ३ महिन्यांचे प्रशिक्षण या नवीन सेवकांसाठी लाभदायक व्हावे, प्रार्थना करा की ते देवाच्या सामर्थ्याने भरल्या जावे आणि त्यांनी देवाच्या वचनाचे व्यवस्थित वाचन करावे.

- सिलास चौहान, स्टेट कोऑर्डिनेटर

देवाचे अभिवचन आणि देवाचा निवासमंडप

ज्या दिवशी आम्ही बातमी ऐकली की आम्ही हिमालयाच्या क्षेत्रांना भेट देण्यासाठी जाणार आहोत, आमचा ८ जणांचा गट आनंदाने भरला. आम्हाला याची जाणीव झाली की आमच्या ठिकाणा पासून क्षेत्र ३००० किमी आहे, परंतू ही क्षेत्र नियमित आमच्या वैयक्तिक प्रार्थनेत असतात. आमच्या प्रवासाचा उद्देश हा होता की गुडवाल क्षेत्र येथे १३ ऑक्टोंबर २०१९ रोजी होणाऱ्या चर्च समर्पण सभेला उपस्थित राहणे. आम्ही पंजाब मधील पठाणकोट कडे प्रवास केला. ज्यांचा ख्रिस्तामध्ये नव्याने जन्म झाला आहे, त्यांच्या साक्ष आणि उपासना यांनी आमची अंतःकरण भरली. गुडवाल क्षेत्र येथील चर्चचे सौ. बेनिटा सेल्वाकुमार आणि सौ. प्रेमा ज्योथी पांडीयान यांच्या प्रार्थनेद्वारे उद्घाटन झाले. हिमाचली आणि बहारी लोक गट तरूणांनी धैर्याने त्यांची साक्ष सांगितली. २०१८ साली सेवक अजयकुमार आणि त्यांची पत्नी बंदो देवी यांच्या प्रार्थने दरम्यान गुडवाल क्षेत्र येथे चर्च बांधण्यात येईल हे अभिवचन पवित्र आत्म्याने त्यांना दिले. त्याच वेळे दरम्यान परमेश्वराने सौ. बेनिटा आणि त्यांच्या कुटूंबाला चर्च बांधण्याची सुचना दिली व त्या दोघा कुटूंबांनी देवाचा विश्वासूपणा सिध्द करण्यासाठी चर्चच्या समर्पणाच्या वेळेस या सर्व गोष्टी सर्वांना सांगितल्या, साक्ष ऐकुन आमचे अंतःकरण आनंदाने भरले. डॉ. ज्युलिएट वनीथा रानी यांची प्रार्थना आणि सौ. प्रेमा ज्योती पांडियन यांचा संदेश नवीन विश्वासणाऱ्यांसाठी लाभदायक होता. ब्र. लाझर आनंदराज ज्यांचा परमेश्वराने आमच्या अंतःकरणाच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी उपयोग करून घेतला तसेच सेवकांचा गट ज्यांनी आमच्या सोबत क्षेत्रांमध्ये प्रवास केला त्यांचे आम्ही आभार मानतो.

- टूर ग्रुप सह डॉ. ज्युलिएट वनीथा रानी

महाराष्ट्र सेवा क्षेत्रातून

महाराष्ट्रातील सर्व विश्ववाणी परिवार व भागीदार हयांना प्रभु येशु ख्रिस्तात अनेक सलाम!

विश्ववाणी महाराष्ट्राच्या सेवेबद्दल आपणाला सांगायला हर्ष वाटत आहे कि तुम्ही केलेल्या प्रार्थने मुळे आम्हाला अधिक आत्मिक बळ मिळत आहे. हया मुळे आम्ही अधिक वेगाने सेवेमध्ये वाढत आहोत. आपणा सर्वांना माहिती आहे की, विश्ववाणीचे ध्येय वचन काय आहे....

रोम १५ : २०-२१ 'पौल म्हणतो ख्रिस्ताची सुवर्ता ज्या लोकांना कोणी सांगितली नाही आणि ज्यांनी ऐकली नाही त्या ठिकाणी सुवार्ता सांगण्याची मला हौस होती.' हया वचना प्रमाणे विश्ववाणी ही संस्था महाराष्ट्रांच्या खेडयांमध्ये काम करत आहे. याचे श्रेय सर्व भारतातील विश्वासणाऱ्यांना जाते कारण त्यांच्या केलेल्या प्रार्थना आणि दिलेले योगदान हे खुप महत्वपुर्ण आहे त्यामुळेच महाराष्ट्रातील खेडी आशिर्वादीत होत आहे.

आम्ही महाराष्ट्रा मध्ये अशा प्रकारे काम करत आहोत –

विदर्भ सेवा क्षेत्र – फिल्ड कॉडिनेटर :– रेव्ह. सत्यदान खंडागळे (भंडारा, गौडिया, चंद्रपूर, गडचिरोली)

सेवा क्षेत्रातील जिल्हे	– ४	सेवक	– २८
खेडयामधील सेवा	–१३५	बायबल अध्ययन वर्ग	– ७३
भक्ती गट	– १३	प्रार्थना मंदिरे	– १०

खांदेश सेवा क्षेत्र – फिल्ड कॉडिनेटर :– रेव्ह. वासु चौधरी (नंदुरबार, धुळे)

सेवा क्षेत्रातील जिल्हे	– २	धुळे, नंदुरबार	सेवक	– १८
खेडयामधील सेवा	– ७७		बायबल अध्ययन वर्ग	– ४८
भक्ती गट	– १८		प्रार्थना मंदिरे	– १३

मध्य महाराष्ट्र सेवा क्षेत्र – वेब मॉनीटर रेव्ह. मोहन निकाळजे(अहमदनगर)

सेवा क्षेत्रातील जिल्हे	– १ अहमदनगर	सेवक	– ४
खेडयामधील सेवा	– २८	बायबल अध्ययन वर्ग	– २५
भक्ती गट	– ७	प्रार्थना मंदिरे	– २

मराठवाडा सेवा क्षेत्र – फिल्ड कॉडिनेटर :– रेव्ह.नागनाथ सुर्यवंशी(नांदेड, लातूर)

सेवा क्षेत्रातील जिल्हे	– २ नांदेड, लातुर	सेवक	– २०
बायबल अध्ययन वर्ग	– ७५	भक्ती गट	– २२
प्रार्थना मंदिरे	– १२	खेडयामधील सेवा	– ९०

विनंती आहे कि हया सर्व विषयांसाठी प्रार्थना करा:

विदर्भ: ३५ नवीन गावे नाताळ साजरा करत आहेत. ऑक्टोंबर महिण्यात विदर्भ सेवाक्षेत्रामध्ये ७ सेवकांची नियुक्ती झाली. आणि हा नाताळ त्यांच्या जीवनामध्ये तारणाचा आनंद घेऊन आला आहे. प्रभूची स्तुती असो.

खांदेश: २० नवीन गावांमध्ये पहिल्यांदा नाताळ साजरा करत आहे. आम्ही जे ४ नवीन सेवक नंदुरबार सेवाक्षेत्रात पाठवले, आहे ते २० नवीन गावामध्ये सेवाकार्य करत आहे, ते यावर्षी नवीन गावामध्ये नाताळ साजरा करत आहेत.

मध्य महाराष्ट्र: १५.९.१९ रोजी कर्जत येथे मांढरे परिवारात उपास प्रार्थनेत एकूण १४ लोक हजर होते. नवीन दोन परिवारात प्रार्थना करण्याची संधी मिळाली. ३ पूरूष व ५ स्त्रियांनी प्रभू येशूवर विश्वास ठेवला. ०८.०९.१९ रोजी वाघोली येथे सिकर्स मिटींग मध्ये एकूण २८ लोक हजर होते. वचन ऐकूण ३ स्त्रिया ४ पूरूषांनी प्रभू येशूचा वैयक्तिक तारणारा म्हणून स्विकार केला. प्रभूची स्तुती असो.

मराठवाडा: आम्ही देवाला धन्यवाद देतो की नांदेड जिल्हयामध्ये गोजेगाव सेवाक्षेत्रात प्रार्थना मंदिराचे उद्घाटन झाले. हया कार्यक्रमामध्ये ४०० लोक उपस्थित होते. प्रभूने कार्यक्रम आशिर्वादित केला, त्याबद्दल आम्ही परमेश्वराच्या नावाला धन्यवाद देतो.

बंधु. सुनिल धुर्वे
मिशन कॉर्डिनेटर, अंबरनाथ
९८२३७६३५७६

चालू घडामोडी

भारताच्या इंटरनेट आणि मोबाईल असोसिएशन च्या वतीने दिलेली माहिती खूप धक्कादायक आहे. देशातील १५ टक्के सक्रिय वापरकर्त्यांचा सल्ला घेता,भारतातील ५ ते ११ वर्षे वयोगटातील अंदाजे ६६ दशलक्ष मुले कुटूंबातील सदस्याच्या उपकरणावर इंटरनेट वापरतात.जर हे आधुनिक डिजिटल जग मुलांची कुवत वाढवत असेल तर ते लाभदायक आहे. परंतू समस्या ही आहे की, भारतीय मुलं जे वेबसाईट वापरतात. ते मोठया समस्येत पडतात. हे सत्य आहे की जे मुलं ऑनलाईन असतात ते मोठया जाळयात पडतात. ते अनावश्यक गोष्टी पाहतात आणि अनावश्यक मैत्री करतात. मागील वर्षांमध्ये घडलेल्या घटना आपल्याला शिकवतात की ऑनलाईन हे मुलांच्या जीवाला धोकादायक आहे.

परमेश्वर भारतातील तरूण पीढीचे वेबसाईटच्या जाळया पासून संरक्षण करो.

मागील वर्षी भारताचा ॲन्युअल ग्लोबल कॉम्पेटीटिव्हनेस इंडेक्स मध्ये ५८ वा नंबर होता. बहुतांशपणे इतर अनेक अर्थव्यवस्थांनी दाखवलेल्या प्रगतीमुळे, भारत ॲन्युअल ग्लोबल कॉम्पेटीटिव्हनेस इंडेक्स च्या १० जागा खाली सरकून ६८ व्या स्थानावर आला आहे. दरम्यान सिंगापूरने अमेरिकेची जागा जगातील सर्वात स्पर्धात्मक अर्थव्यवस्था म्हणून घेतली आहे.

परमेश्वर भारताच्या आर्थिक पातळीला स्थिरतेकडे आणोत.

महाराष्ट्रातील प्रमोशनल कार्यकर्ते संपर्क

मुंबई

ब्र. एबेनेजर मोजेस (एरिया कॉडिनेटर)	९८९०२२३३५५
रेव्ह. इम्मानुएल	९०२९८७२२१३
ब्र.जॉर्ज बाबु	९०४९३६६४०५
ब्र. दिपक गद्रे	९७०२२९९५५२
ब्र. जुलुपाला आयजॅक	९३२४७४७२७९
ब्र. योहान मावची	९६१९५८५८६४
ब्र. स्टॅनलिन सिल्व्हराज	९३२४६६५६३०
ब्र. सिमसन नाडार	९८३३७१३५०३

पुणे

ब्र. सुधाकर मनोहरे (एरिया कॉडिनेटर)	८६००९२५५२७
ब्र. फिलीप वानखेड	८९७५९१०१२४
ब्र. संदिप गायकवाड	८०८७५२५८२०
ब्र. प्रकाश निकाळजे	९७३०६७७०५१

औरंगाबाद

ब्र. गणेश सोनुले (एरिया कॉडिनेटर)	९९६०१०५७०२
ब्र. शरद पवार अहमदनगर	९२२६८००६२८
ब्र. अमोल कांबळे	९८२२९६०४५०

नागपुर

ब्र. मार्क नवले (एरिया कॉडिनेटर)	९३७०४०५२२७
ब्र. नितिन रामटेके	९५९५१५६०८९
ब्र. बुधाजी गेडाम	९४०४२६४३०३
ब्र. दुर्योधन मडावी	८८८८१७९७८१

नाशिक

रेव्ह. रमेश इंगळे (मिशन एरिया कोर्डिनेटर)	९८८१२००८६०
ब्र. संजय गावीत (एरिया कॉडिनेटर)	९४०३६५६७५९
ब्र. अब्राहाम गावित नवापुर, नंदुरबार	९४२१५०२९१८

सोलापुर

ब्र. जुगल हरपाल (एरिया कॉडिनेटर)	९६८९१२६७३४
ब्र. आशिष मेश्राम कोल्हापुर	९७६६९०४७५४

५० सेवकांचे समर्पण...

देवाच्या कृपेद्वारे आयोजित करण्यात आले

५० मिशनऱ्यांना हे मोठयाने जाहिर करण्याचे पाचारण प्राप्त झाले की तारणासाठी येशूच्या नावा शिवाय इतर कोणतेही नाव या भूतलावर नाही. पूवानकोड येथे २५-२७ ऑक्टोंबर २०१९ दरम्यान घेण्यात आलेल्या ५० मिशनऱ्यांच्या समर्पण सभेला उपस्थित राहणारे आशिर्वादित असोत.

''मी तयार आहे'' म्हणण्याची त्यांची वचनबध्दता आमचे नेत्र अश्रूंनी भरते. ते सर्व जे जाण्यासाठी वचनबध्द आहेत ते देवाच्या नजरेत सन्माननीय आहेत. पश्चिम बंगाल मधील १२ सेवक २७.१०.२०१९ रोजी सि. एस. आय पूवानकोड येथे समर्पित करण्यात आले. मुख्य प्रेसबिटर रेव्ह. एस. रिंगले जेयाकुमार आणि असिस्टंट प्रेसबिटर श्री. एल. आर जेबासिंग यांचे आम्ही आभार मानतो. कन्नानुर सि. एस. आय चर्च येथे रविवारच्या उपासने मध्ये ७ आसामी सेवकांचे समर्पण करण्यात आले. चर्चचे पाळक रेव्ह. वाय लॉरेन्स आणि असिस्टंट पाळक श्री. आर. जेयाकुमार आमोस यांचे आम्ही आभार मानतो. सि. एस. आय कुवारागुविलाई चर्च येथे एका पश्चिम बंगाल क्षेत्र सेवकांचे समर्पण करण्यात आले. त्या सेवकांचे समर्पण केल्याबद्दल आणि त्यांना क्षेत्रावर पाठविल्याबद्दल आम्ही रेव्ह. ई.जेबासिंग यांचे आभार मानतो. २७.१०.२०१९ रोजी ५:३० वाजता ओडीसा मधील ३० मिशनऱ्यांना पदवी प्रदान करण्यात आली व त्यांचे समर्पण करण्यात आले.

एमिल अन्नन यांचे शब्द असे म्हणतात की लाटांप्रमाणे सेवक उभे राहत आहेत हे भविष्यवाणीचे शब्द आहेत. जे लोक समर्पण सभेचे साक्षीदार आहेत, त्यांनी जेव्हा ३० सेवकांना वेदीवर पाहिले तेव्हा त्यांचे नेत्र आनंदाश्रुंनी आणि त्यांची अंतःकरण येशूकडील बलाने भरली गेली. हे आमच्यासाठी एक अद्भूत आहे की ज्यावेळेस देव जो समुद्राच्या लाटांप्रमाणे सेवकांना उभे करतो त्याचवेळेस तो सेवकांना सहकार्य करणारे व त्यांच्यासाठी प्रार्थना करणारे अंतःकरण देखील उभे करतो.

ज्यांनी ३ दिवसीय सुवार्ता सभेचे व मिशनरी समर्पण सभेचे आयोजन केले त्या प्रमुख पाळकांचे रेव्ह. जॉन पीटर, सहाय्यक पाळक रेव्ह. जे हडसन आणि श्री. जे अनिल कुमार यांचे आम्ही आभार मानतो. मुलाचेल पाळकीय भाग मंडळयांमधील पाळकांचे आम्ही आभार मानतो ज्यांना वेदी सजवली. आम्ही प्रार्थना करतो की, विश्ववाणीचे प्रतिनिधी जे कोणत्याही प्रतिफळाची अपेक्षा न करता विशेष सभेसाठी कार्य करतात, कुटूंब जे सेवकांना सहकार्य करतात आणि अंतःकरण जी प्रार्थना करतात या सर्वांच्या जीवनावर येशूचे प्रेम आणि कृपा बहुगुणित होवो.

– पॉन सुबरसन आणि कन्याकुमारी जिल्हयातील सेवक

RNI. REGD. NO. RN 45017/89 POSTAL REGD. NO. H/SD/206/2018-2020 MARATHI | DATE OF PUBLICATION 23.12.2019

पंचूची स्तुती असो सेवाक्षेत्रातील १० नवीन प्रार्थना मंदिरसाठी

NAVAGAON, GUJARAT - 19.10.19

VIRPUR, GUJARAT - 10.11.19

THEELESU, A.P. - 22.10.19

KARLAMUHAN, ODISHA - 10.11.19

ULEMCHARA PARA, TRIPURA - 27.10.19

GOURIGUDA, ODISHA - 10.11.19

ODADHA, A.P. - 02.11.19

BODDAVALASA, A.P. - 10.11.19

VIJAYPUR, U.P. - 10.11.19

RAIBAHADUR PARA, TRIPURA - 18.11.19

VISHWA VANI SAMARPAN - MARATHI LANGUAGE
Printed and Published by P. Selvaraj on behalf of VISHWA VANI, a registered society (Regn. No.17871 of 1987) and printed at CAXTON Offset Pvt. Ltd., 11-5-416/3, Red Hills, HYD-04. and published at 1-10-28/247, Anandapuram, ECIL Post, HYD-62. EDITOR: P SELVARAJ POSTING DATE: 26.12.2019